सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०२ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २०७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### बोगस-दुबार मतदार प्रकरणात न्यायालयात जाणार - उद्धव ठाकरे

मुंबई, १ नोव्हेंबर - ही विरोधी पक्षांची एकजूट नाही. तर लोकशाहीचं प्रतिनिधीत्व करणाऱ्यांची एकजूट आहे. आम्ही लोकशाही मार्गाने यांना ठोकण्यासाठी तयार आहोतच, पण आता जनतेनेही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी एकत्र आलं पाहिजे. आपल्या डोळ्यासमोर लोकशाहीचा खून होत आहे. त्यामुळे हे जे काही चाललं आहे, ते थांबवलं पाहिजे. मतचोरी करणाऱ्यांना सांगतो आज ठिणगी बघत आहात. या ठिणगीची आग कधी होईल सांगता येत नाही. तुमच्या बुडाला लागेल. बोगस आणि दुबार मतदारांचे सगळे पुरावे घेऊन आम्ही न्यायालयात जाणार आहोत, आता न्यायालयाकडून आम्हाला न्यायाची अपेक्षा असल्याचे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. मतदार याद्यांमधील घोळ, मतचोरी या विरोधात महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि मनसे यांच्या वतीने मुंबईत 'सत्याचा मोर्चा' काढण्यात आला होता. हा मोर्चा फॅशन स्ट्रीट, मेट्रो सिनेमामार्गे मुंबई महापालिकेच्या प्रवेशद्वारावर येऊन थांबला. या मोर्चात काँग्रेस, शरद पवार गट, ठाकरे गट यांच्यासह माकप, भाकप, शेकाप, मनसे आणि इतर संघटना सहभागी झाल्या होत्या.

### लातूर : केंद्रेवाडीतून ८ फुट लांब, १०० किलो वजनाची मगर पकडली

लातूर, १ नोव्हेंबर : लातूर जिल्ह्यातील केंद्रेवाडीतून ८ फुट लांब, १०० किलो वजनाची मगर पकडली असून शेतकऱ्यांची धास्ती मिटली आहे. अहमदपूर तालुक्यातील ढाळेगाव, केंद्रेवाडी शिवारात गेल्या काही दिवसांपासून मगर असल्याची चर्चा होती. ही मगर या परिसरातील काही शेतकऱ्याला दिसल्याने भीतीचे वातावरण होते. याची माहिती तातडीने वन परिमंडळ अधिकारी कार्यालय, अहमदपूर यांना कळविण्यात आली. वन विभागाच्या पथकाने दोन दिवसांपासून ढाळेगाव, अंधोर आणि केंद्रेवाडी शिवारात शोधमोहीम राबविली. या मोहीमेला यश आले असून, केंद्रेवाडी शिवारात १०० किलो वजनाची मगर पकडण्यात आली. ही मगर ८ फूट लांब आणि १०० किलो वजनाची असल्याचे सांगण्यात आले.

# व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात चेंगराचेंगरी; ९ भाविकांचा मृत्यू

आंध्र प्रदेश : आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यामध्ये एक दुर्दैवी दुर्घटना घडली आहे. येथील व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात चेंगराचेंगरी झाली, ज्यात ९ भाविकांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, जखमी झालेल्या अनेक भाविकांची प्रकृती गंभीर असल्याचेही सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच बचाव पथके आणि प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले असून, जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

श्रीकाकुलम मंदिरात कार्तिक एकादशीला चेंगराचेंगरी; गर्दी नियंत्रणाबाहेर

प्राथमिक अहवालानुसार, मंदिर परिसराच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दीचा दबाव वाढला. यामुळे लोकांमध्ये गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरीची स्थिती निर्माण झाली. गोंधळात अनेकजण खाली कोसळले आणि त्यांच्या अंगावरून इतरांनी जाण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे हा अपघात अधिक भीषण झाला. माहिती मिळताच प्रशासनाने मदत आणि बचाव कार्य सुरू केले. जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जिल्हा प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून, नियंत्रणासाठी अतिरिक्त पोलीस दल तैनात केले आहे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, सकाळपासूनच मंदिरात गर्दी वाढली होती आणि पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे गर्दी नियंत्रणाबाहेर गेली. स्थानिक प्रशासनाने या अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले असून, गर्दी नियंत्रणात कुठे चूक झाली हे शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी व्यक्त केला शोक

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी श्रीकाकुलम जिल्ह्यातील काशीबुग्गा वेंकटेश्वर मंदिरातील चेंगराचेंगरीच्या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री नायडू यांनी म्हटलंय की, काशीबुग्गा वेंकटेश्वर मंदिरातील चेंगराचेंगरीच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. या दुर्दैवी घटनेत झालेली जीवितहानी अत्यंत दुःखद आहे. मी मृतांच्या कुटुंबीयांप्रती शोक व्यक्त करतो. त्यांनी अधिकाऱ्यांना जखमींना शक्य तितके उत्तम उपचार देण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी स्थानिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना घटनास्थळी भेट देऊन मदत कार्यांचे निरीक्षण करण्यास सांगितले आहे. मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला तातडीने मदतकार्य आणि उपचारांवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले आहेत.

## सिकंदर शेखमुळे महाराष्ट्राच्या कुस्तीला लागला बट्टा

### पंजाब पोलिसांनी केली अटक



पुणे : महाराष्ट्र केसरी ही मानाची स्पर्धा जिंकणं प्रत्येक कुस्तीपटूचं स्वप्न असतं. २०२३ - २०२४ वर्षी सोलापूरच्या सिकंदर शेख या पट्ट्याने मानाची महाराष्ट्र केसरी ही स्पर्धा जिंकत सोलापूरचे नाव मोठे केले. परंतु पंजाब पोलिसांनी शस्त्र बाळगण्याप्रकरणी सिकंदर शेखसह चार जणांना अटक केली आहे. या अटकेमुळे आंतरराष्ट्रीय शस्त्र पुरवठा साखळीचा पर्दाफाश झाला आहे.

वडिलांनी हमाली करून वाढवलेला पैलवान सिकंदर शेखच्या शस्त्र तस्करीच्या कारनाम्याने आजपर्यंत कमावलेली प्रतिष्ठा धुळीला मिळाली आहे. सांगलीच्या मल्लांनी देखील शेखच्या अटकेवर संताप व्यक्त केला आहे.

शेखचा हा गुन्हा अत्यंत गंभीर असून, शस्त्र तस्करी प्रकरणात त्याचा उघड झालेला संबंध आणि त्याच्या संपर्कात महाराष्ट्रात कोण कोण होते याची देखील चौकशी होणं गरजेचं आहे असे मत सांगलीचे ज्येष्ठ मल्ल वस्ताद संजय भोकरे यांनी सिकंदर शेखच्या अटकेबाबत मांडले आहे.

## कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरला आलेल्या प्रसिद्ध कीर्तनकाराचं निधन

पंढरपूर: कीर्तन परंपरेत संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे कोकणातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. दत्ताराम सीताराम नागप महाराज यांचं शुक्रवारी पहाटे पंढरपूर येथे निधन झालं. कार्तिकी एकादशी निमित्त ते पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी आले होते.

गुरुवारी रात्री ते कीर्तन करून आपल्या निवासस्थानी परतले असता त्यांना पहाटे अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि उपचारापूर्वीच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. वयाच्या ६० व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. वैभववाडी तालुक्यातील आखवणे पुनर्वसन गावठण येथील रहिवासी असलेल्या नागप महाराजांनी वडिलांकडून कीर्तन परंपरेचा वारसा घेतला आणि तो अखेरपर्यंत जपला.

कीर्तनकार सोबत समाजसेवकही होते. मुंबईतील बेस्ट खात्यात अधिकारी म्हणून सेवा दिल्यानंतर निवृत्तीनंतर ते पूर्णपणे समाजकार्यात गुंतले. अरुणा प्रकल्प संघर्ष कृती समितीचे मुंबई सरचिटणीस म्हणून कार्यरत राहून त्यांनी धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच अनेकांना सानुग्रह अनुदान मिळालं. तसेच आखवणे भोम आणि नागपवाडी पुनर्वसन गावठण उभारणीतही त्यांचा मोलाचा वाटा होता.

## झारखंड आणि उत्तर बंगालमध्ये अतीवृष्टी होण्याची शक्यता, खराब वातावरणामुळे अर्थमंत्र्यांनी रद्द केला भूतान दौरा

सिक्कीम: भारत-चीन सीमेवर झालेल्या मुसळधार हिमवृष्टीमुळे सिक्कीममधील तापमानात मोठी घट झाली आहे. हिमवृष्टीमुळे अनेक भागात पारा शून्याखाली गेला आहे. ज्याचा परिणाम सिक्कीममधील जनजीवनावर झाला असून हवामान खात्याने पुढील २४ तासांत सिक्कीममधील हवामान आणखी बिघडण्याची शक्यता वर्तवली आहे. यासाठी सिक्कीममध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

सिक्कीममध्ये जारी करण्यात आलेल्या रेड अलर्टमध्ये पर्यटकांना उंचावरील भागात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर सीमा रस्ते संघटनेचे पथक बर्फ हटवण्यासाठी



सतत काम करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, हा हवामान बदलाचा परिणाम असू शकतो. कारण, अशी हिमवृष्टी सहसा नोव्हेंबरच्या मध्यापासून सुरू होते.

हवामान विभागाने आजपासून पुढील दोन दिवस अरुणाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि वादळ होण्याची शक्यता वर्तवली आहे. हवामान विभागानुसार, तवांग, पश्चिम कामेंग, लोअर सुबानसिरी आणि अंजाव जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी खूप मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, त्यामुळे या भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. लोअर दिबांग व्हॅलीच्या काही भागातही वादळासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

झारखंडमध्ये सुद्धा पावसाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने १३ जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' जारी केला आहे. तर उत्तर बंगालसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे . चक्रीवादळ मोंथाच्या प्रभावामुळे, पुढील २४ तासांत उत्तर बंगालमधील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळ होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने सांगितले की अलीपूरद्वार, कूचबिहार, जलपाईगुडी, कालिम्पोंग आणि दार्जिलिंग जिल्ह्यांमध्ये वादळासह मध्यम ते मुसळधार पाऊस पडू शकतो.

खराब हवामानामुळे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचा भूतानचा अधिकृत दौरा रद्द करण्यात आला आहे. सीतारमण ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान भारत आणि भूतानमधील आर्थिक संबंध मजबूत करण्याच्या दृष्टीने भूतानला भेट देणार होत्या. या चार दिवसांच्या दौऱ्यात त्या आर्थिक व्यवहार विभागाच्या भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार होत्या.

## बारामती ॲग्रो साखर कारखान्याच्या गाळप हंगामास सुरुवात : शेतकऱ्यांच्या खात्यात मिळणार प्रती टन ३१२२

तभा वृत्तसेवा

कन्नड -०१ नोव्हेंबर - ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी! कन्नड तालुक्यातील बारामती ॲग्रो साखर कारखान्याचा नवा गाळप हंगाम शनिवारी उत्साहात सुरू झाला. कारखान्याचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे यांच्या हस्ते ऊसाची मुळी टाकून हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.


उद्घाटनप्रसंगी शेतकी अधिकारी ए.डी. पठाण, पंकज बोराडे, मिलिंद देशमुख, सतीश तेलांडे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी गुळवे यांनी सांगितले की, या हंगामात कारखान्याकडून शेतकऱ्यांना प्रती टन ३१२२ इतका दर दिला जाणार आहे. ऊस तौलानंतर केवळ पंधरा दिवसांत रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. सुधारित उसाच्या जातींचा स्वीकार केल्याने साखरेची गुणवत्ता वाढली असून, त्यामुळे दर पश्चिम महाराष्ट्रातील तुलनेत अधिक ठेवता आला आहे, असेही ते म्हणाले. या हंगामासाठी कन्नड, फुलंब्री, वैजापूर, अंबड व जाफ्राबाद या तालुक्यांतील सुमारे ४३,६०० एकर क्षेत्रातून ऊसाची नोंद झाली आहे. यावरून अंदाजे १० लाख ७५ हजार टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट कारखान्याने ठरवले आहे. वाहतुकीसाठी ८५० वाहने आणि ३४५ बैलगाड्या या माध्यमातून करारबद्ध करण्यात आले असून, सुमारे ४० कोटी रुपये इतकी आगाऊ रक्कम मुकर्दमांना वितरित करण्यात आली आहे.


## कन्नडमध्ये महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह!

### हिवरखेडा रोडवर मंगळसूत्र चोरीचा प्रयत्न; पोलिस गस्त ठप्प, नागरिकांत संताप



महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबीन विचार करता पोलिसांनी शहरात दामिनी पथकांची गस्त वाढवावी वर्दळीच्या ठिकाणी गस्त होणे खूप गरजेचे आहे

उर्मिला पवार
समाजसेविका



शहरात सतत सोनसाखळी ओढण्याच्या घटना घडत आहेत. आम्ही संध्याकाळी एकटं बाहेर जाणं टाळतोय. पोलिसांनी गस्त वाढवून महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यायला हवं.

शिल्पा संदीप उजागरे, गृहिणी



पोलिसांचे लक्ष अवैध धंद्यांकडे आणि राजकीय दबावाखालील कामांकडे जास्त आहे, या घटनांमुळे प्रशासनावरील विश्वास कमी होत चाललाय.

विद्या बंटी काशीनंद
माजी नगरसेविका कन्नड




कॉलेज, शाळा, परिसरात पोलिस गस्त करत नसल्याने अशा घटनांची वाढ होत आहे, शालेय विद्यार्थिनी सुद्धा सुरक्षित नाहीत, अशा चोरट्यांची शहरातून धिंड काढली पाहिजे.

ए.एस.महाजन, शिक्षिका

तभा वृत्तसेवा

कन्नड - शहरातील हिवरखेडा रोडवरील आयडिया पॉईंटच्या पाठीमागील कॉलनीत एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरीचा प्रयत्न दि. ३१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेआठच्या सुमारास झाला. अर्चना सुनील चव्हाण (वय ४०) या कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. घरी परतत असताना सिंचन नगरीकडून आलेल्या चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळ्याचे मंगळसूत्र तोडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी धैर्याने प्रतिकार करताच चोरट्याने त्यांना जोराचा धक्का दिला, यात त्या खाली कोसळून जखमी झाल्या. शेजारील नागरिकांच्या तत्परतेमुळे चोरटा पसार झाला आणि पुढील अनर्थ टळला.

या घटनेमुळे शहरातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे पोलिसांची गस्त आता नाममात्रच राहिली आहे. पूर्वी उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या



कार्यकाळात रात्रीच्या गस्तीचे रजिस्टर ठेवले जाई आणि त्यावर अधिकाऱ्यांच्या सहीने नोंदी होत असत, मात्र आता ते सर्व थांबल्याने गस्त झाली की नाही, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.नागरिकांचे म्हणणे आहे की, पोलिसांची गस्त रात्री तर होत नाहीच पण दिवसा सुद्धा दिसत नाही. शहरातील शाळा-कॉलेज परिसर, सिंचन नगरी, ग्रामीण रुग्णालयाजवळील रस्ते तसेच खंडसरी परिसर ही ठिकाणे नेहमी निर्जन असतात. या ठिकाणी नशा करणारे नशेखोर आणि संशयास्पद हालचाली करणारे व्यक्ती आढळतात, मात्र पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी डोळेझाक केल्याची नागरिकांची तक्रार आहे.याबाबत प्रभारी सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री यांना संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी तातडीने गस्त वाढवावी, निर्जन भागात पेट्रोलिंग करावं आणि नागरिकांमध्ये सुरक्षा भावना निर्माण करावी, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.



## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २८४/२०२५

अर्जदारः-१) गउबाई मैनाजी जाधव, वय ८० वर्ष, धंदा-घरकाम, रा. बनोटी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर २ लताबाई गणेश जाधव, वय-५० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३ सतीष गणेश जाधव, वय २५ वर्ष, धंदा-शेती, रा. वरीलप्रमाणे. ४ सोनाली संतोष ढंगारे, वय-३६ वर्ष, धंदा घरकाम. रा. शिंदेफळ, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर। ५ चित्रा ज्ञानेश्वर राऊत वय-३७ वर्ष, धंदा-घरकाम रा. तळनेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

//विरुध्दः//

गैरअर्जदारः कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत गणेश मैनाजी जाधव है दिनांक २६/०१/२०२४ रोजी बनोटी ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत गणेश मैनाजी जाधव यांचे वारस असून त्यांना शासकीय कामकाजासाठी, लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०४/१२/२०२५.

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहास्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

'किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २५८/२०२५

अर्जदारः-१) रेखाबाई मनोहर पाटील, वयः ६० वर्षे, धंदाः घरकाम, रा. निंभोरा ता. सोयगांव जि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद). २) कल्पनाबाई मन्साराम बोरसे, वयः ५८ वर्षे, धंदाः घरकाम रा. वडाळे (वडाळी) ता. चाळीसगाव जि जळगांव. ३) शंकर बाबुराव पाटील (निकम), वयः ५५ वर्षे, धंदाः संभाजीनगर (औरंगाबाद). शिक्षक रा. निंभोरा ता. सोयगांवः जि छत्रपती ४) नम्रताबाई अनिल देवरे, वयः- ५३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. खडकदेवळा बु ता. पाचोरा जि. जळगांवों ५) प्रतीभा संजय पाटील, वयः ५० वर्षे, धंदाः घरकाम, रा. वडाळे (वडाळी) ता. चाळीसगांव जि जळगांव. ६) सरलाबाई रामकृष्णा पाटील, वयः ४८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. हणमंतखेडे बु ता. एरंडोल जि. जळगांव. ७) सुलोचना बारकु पाटील, वयः ४६ वर्षे, धंदाः धरकाम, रा. कुंझर ता. चाळीसगांव जि. जळगांव,

// विरूध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे कै. इंदुबाई बाबुराव पाटील (निकम) हे दिनांक:- १६/०९/२०१७ ला मौजे निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे।

(पुढील दिनांक: २८/११/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ३१/१०/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहास्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी दिलेल्या अधिकार व माहिती नुसार संबंधीतास सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. संदिप सोपानराव दारुंटे रा. गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या नावे दुकान क्रमांक १० बेसमेन्ट फ्लोअर, क्षेत्र ३९.२७ चौ. मीटर नगर परिषद गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर हद्दीतील वॉर्ड क्र.१० मधील मिळकत क्र.२४०/ब (जुना क्रमांक) (नविन क्रमांक २४०/ब/१) असा आहे. असे की, श्री. संदिप सोपानराव दारुंटे यांच्या ताब्यातील मुळ खरेदीखत क्र.२९२५/२०१५ प्रवासात कुठेतरी गहाळ झालेले आहे. तरी ज्या कोणास सदरील मुळ दस्त सापडल्यास माझे नमुद पत्यावर जमा करावा तसेच सदरील मिळकत सारस्वत बँक येथे तारण देणार आहे तरी ज्या कोणास सदरील मिळकतीबाबत हक्क, ताबा, तारण देण्यास हरकत असल्यास त्यांनी सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०७(सात) दिवसात आपला लेखी आक्षेप नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक :- ३०/१०/२०२५

करीता हे जाहीर प्रगटन

**प्रगटन देणार मार्फत**
**रविराज बी. दारुंटे**
**ॲडव्होकेट**
**पत्ता : मृत्युंजय लक्ष्मी कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद**
**मो. ९०२८६४८३२९**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर**

सिव्हिल एम ए. क्र ७३०/२०२५.

अर्जदार :- १) मिरा अर्जुन गायके वय ७७ वर्ष धंदा घरकाम रा. हैबतपुर. ता. गंगापूर जि औरंगाबाद २) दादासाहेब अर्जुन गायके वय: ३६ वर्ष धंदा शेती रा. हैबतपुर. ता. गंगापूर जि औरंगाबाद ३) अनीता वैभव काळे वय: ३४ वर्ष धंदा घरकाम रा. बी २२/२३ नवीन पंचदिप हाऊसिंग सोसायटी सैनिक सोसायटी रोड विजयनगर देवळाली नाशिक ता.जि. नाशिक ४) सविता ज्ञानेश्वर जामकर वय ३२ वर्ष धंदा घरकाम गोंदेगाव ता.जि.अहमदनगर

विरुद्ध

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण:-बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. ए.बी. कुलकर्णी यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन असे की, अर्जदार क्र १ हे मयत अर्जुन अंबादास गायके यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. तसेच मयत अर्जुन अंबादास गायके मौजे. हैबतपुर ता. गांगपूर जि औरंगाबाद येथील रहिवाशी होते व ते दिनांक १२/१२/२०२४ रोजी हैबतपुर येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र. १ ते ४ शिवाय इतर कोणीही वारस नाही. तसेच मयत अर्जुन अंबादास गायके यांचे आई व वडील हे देखील यापूर्वीच मयत झालेले आहे. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. प्रकणात पुढील तारीख १७/११/२०२५ आहे. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, क स्तर गंगापूर

# कचनेर येथे श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर अतिशय क्षेत्राची वार्षिक यात्रा ४ ते ६ नोव्हेंबर दरम्यान

छत्रपती संभाजीनगर (तभा वृत्तसेवा) - श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर अतिशय क्षेत्र येथे दिनांक ४, ५ आणि ६ नोव्हेंबर २०२५ रोजी वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन रिसरातील चातुर्मास वास्तव्यास असणाऱ्या मुनी संघाच्या मार्गदर्शनाखाली व सानिध्यात करण्यात आले आहे.. या धार्मिक सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून वार्षिक यात्रा महामोहोत्सव दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ ते दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत होणार असून मुख्य महामस्तकाभिषेक कार्तिक शुद्ध पौर्णिमा दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी होणार आहे असल्याचे सुरेशकुमार कासलीवाल अध्यक्ष विश्वस्थ मंडळ यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले, या वेळी भरतकुमार ठोळे मनेजिंग ट्रस्टी विश्वस्थ मंडळ,सुनीतकुमार पाटणी



अध्यक्ष कार्यकारिणी मंडळ ,निलेशकुमार काला महामंत्री कार्यकारिणी मंडळ ,हेमंत कुमार कासलीवाल आदी उपस्थित होते. या तीन दिवसांच्या महामहोत्सवात विविध धार्मिक विधी, पूजन, अभिषेक, प्रवचन, भजन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातून भाविक या पवित्र स्थळी दर्शनासाठी येणार असून श्रद्धा, भक्ती आणि सद्भावनेचे दर्शन घडणार आहे.पायी येणाऱ्या भाविकांसाठी मार्गावर चहापान व फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. आडुळ मार्गे येणाऱ्या सर्व पायी दिंड्यांसाठी चार दिवस भंडाऱ्याचे तसेच निवास व्यवस्था करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या नेतृत्वात, व्यंकट राठोड उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. शिवानंद बिडवे तहसीलदार कमलाताई फतपुरे सरपंच, ग्रामस्थ ,संस्था ,पदाधिकारी व सर्व विभाग प्रमुखांना महत्त्वाच्या सूचना करून यात्रा येथे यशस्वी व उत्कृष्ट रीतीने संपन्न करण्याचे आदेश केले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २२०/२०२५

अर्जदारः १) मौरावाई सयाजी सपकाळ, वय ६५ वर्ष, धंदा-घरकाम. रा. किन्ही, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) २) प्रताप सयाजी सपकाळ, वय ४३ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३) घनश्याम सयाजी सपकाळ, वय-४० वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे

// : विरुध्द :- //

गैरअर्जदारः-कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत सयाजी शिवाजी सपकाळ हे दिनांक २७/०३/२०२५ रोजी किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत सयाजी शिवाजी सपकाळ यांचे वारस असून त्यांना शासकीय कामकाजासाठी, लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २६/११/२०२५.

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहास्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि. दिवाणी अर्ज क्र.७३३/२०२५

अर्जदार : अरुण गोपालराव पदे, वय ६३ वर्षे, धंदा शेती, रा. ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण :-वारसहक्क कायदा कलम ३७२ नुसार वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार हा वरील ठिकाणचा राहणारा असुन अर्जदाराची चुलती नामे शकुंतला त्रिविक्रमराव पदे या गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे अर्जदारासोबत वास्तव्यास होत्या, त्या दिनांक १९/१२/२०२० रोजी त्यांचे राहते घरी गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे. तसेच मयत शकुंतला त्रिविक्रमराव पदे यांचे पति त्रिविक्रीमराव पदे हे यापुर्वीच मयत झालेले आहे, दोन्ही मयतांचे वैवाहिक संबंधातुन कोणतेही अपत्य जन्मास आलेले नसुन मयतांचा संपूर्ण सांभाळ, देखभाल व त्यांचा अंत्यविधी हा अर्जदारानंच केलेला आहे. मयत शकुंतला त्रिविक्रमराव पदे यांना अर्जदार हाच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत शकुंतला त्रिविक्रमराव पदे यांचे नावे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद आताची भारतीय स्टेट बँक शाखा गंगापुर येथे बचत खाते क्र.६२३२३१८५७११ असा असुन त्यामध्ये रक्कम रु.२९,१०८.१८ पै./- (अक्षरी एकोनतीस हजार एकशे आठ रु.१८ पै.) शिल्लकजमा असुन ती रक्कम मिळण्यासाठी अर्जदार यांनी या न्यायालयात हिंदु वारसहक्क कायदा कलम ३७२ नुसार वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी दिले आहे. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक १७ /१२/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, क स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर**

सिव्हिल एम ए. क्र ७२७/२०२५.

अर्जदार : १) भाऊसाहेब अंबादास गायके वय ६३ वर्ष शेती रा. हैबतपुर, ता. गंगापूर जि औरंगाबाद २) गिरा अर्जुन गायके वय ७७ वर्ष धंदा घरकाम रा. हैबतपुर, ता. गंगापूर जि औरंगाबाद ३) दादासाहेब अर्जुन गायके वय ३६ वर्ष धंदा शेती रा. हैबतपुर, ता. गंगापूर जि औरंगाबाद ४) अनीता वैभव काळे वय ३४ वर्ष धंदा घरकाम रा. बी २२/२३ नवीन पंचदिप हाऊसिंग सोसायटी सैनिक सोसायटी रोड विजयनगर देवळाली नाशिक ता.जि. नाशिक ५) सविता ज्ञानेश्वर जामकर वय ३२ वर्ष धंदा घरकाम गोंदेगाव ता. जि. अहमदनगर

विरुद्ध

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण :-बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. ए.बी. कुलकर्णी यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, असे की, अर्जदार क्र १ हा मयत अंबादास रखमाजी गायके यांचा मुलगा आहे अर्जदार क्र. २ ही मयत मुलगा नामे अर्जुन अंबादास गायके यांची पत्नी आहे अर्जदार क्र. ३ हा मयत अर्जुन यांचा मुलगा आहे अर्जदार क्र. ४ व ५ ह्या मयत अर्जुन यांच्या मुली आहेत तसेच अर्जदार क्र. १ यांची आई व मयत अंबादास यांची पत्नी यापूर्वीच मयत झालेली असून त्यांचा मुलगा नामे अर्जुन अंबादास गायके हा दिनांक १२/१२/२०२४ रोजी मौजे. हैबतपुर. ता. गंगापूर येथे मयत झालेले आहेत व अर्जदार क्र १ यांचे वडील व अर्जदार क्र. २ हिचे सासरे व अर्जदार क्र. ३ ते ५ यांचे आजोबा नामे मयत अंबादास रखमाजी गायके हे मौजे हैबतपुर ता. गंगापूरजि औरंगाबाद येथील रहिवाशी होते व ते दिनांक २१/०९/२०१६ रोजी हैबतपुर येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र. १ ते ५ शिवाय इतर कोणीही वारस नाही, करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. प्रकणात पुढील तारीख १७/१२/२०२५ आहे. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, क स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २२१/२०२५

अर्जदारः १) पुर्णाजी देवराम गोराडे, वय ६५ वर्ष, धंदा-मजुरी, रा. किन्ही, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर २) गणेश पुर्णाजी गोराडे, वय ४० वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३ काकासाहेब पुर्णाजी गोराडे, वय-३७ वर्ष, धंदा- मजुरी, रा. वरीलप्रमाणे

// विरुध्द //

गैरअर्जदारः-कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत रुख्मनबाई पुर्णाजी गोराडे हे दिनांक २०/०५/२०२३ रोजी किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत रुख्मनबाई पुर्णाजी गोराडे यांचे वारस असून त्यांना शासकीय कामकाजासाठी, लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २७/११/२०२५

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहास्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ७३६/२०२५ — पुढील तारिख - १८/१२/२०२५

अर्जदार:- १. वनिता अशोक गव्हाणे वय. ३९ वर्ष धंदा. घरकाम रा. मारोती मंदिर जवळ, आंबेवाडी, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर मो. नं.९३५९८६२६४० २. यश अशोक गव्हाणे वय. १९ वर्ष धंदा, शिक्षण रा. मारोती मंदिर जवळ, आंबेवाडी, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३ ओम अशोक गव्हाणे वय. १७ वर्ष धंदा. शिक्षण करिता अ.पा.क. अर्जदार नं. १ (आई) वनिता अशोक गव्हाणे रा. मारोती मंदिर जवळ, आंबेवाडी, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४ कमलबाई पंढरिनाथ गव्हाणे वय. ७९ वर्ष धंदा. घरकाम रा. मारोती मंदिर जवळ, आंबेवाडी, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४ पंढरीनाथ रंगनाथ गव्हाणे वय ८४ वर्ष धंदा. शेती रा. मारोती मंदिर जवळ, आंबेवाडी, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-विरूध्दः-

गैरअर्जदार-निरंक

प्रकरण-कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री. ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ यॉम्ये रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ थे पति व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल आणि अर्जदार नं. ४ व ५ यांचा मुलगा नागे अशोक पंढरीनाथ गव्हाणे हे दि. ३०/०६/२०२५ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत अशोक पंढरीनाथ गव्हाणे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत अशोक पंढरीनाथ गव्हाणे यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत अशोक पंढरीनाथ गव्हाणे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत अशोक पंढरीनाथ गव्हाणे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आश्वेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत अशोक पंढरीनाथ गव्हाणे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्द्धी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधिकधक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र.७३९/२०२५

अर्जदार-१) संजय महादु शेटे, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. रामराई ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) परशुराम पि. गोकुळ शेटे, वय १२ वर्षे धंदा शिक्षण, ३) कु. पुजा पि. गोकुळ शेटे, वय १४ वर्षे धंदा शिक्षण, अर्जदार क्र.२ व ३ करीता अज्ञान पालन कर्ता अर्जदार क्र. १

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण :-कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे वावत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ व ३ यांचा चुलता आहे. अर्जदार क्र.१ ची आई व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी (वडीलांची आई) नामे इंदुबाई महादु शेटे या दिनांक २६/११/२०२३ रोजी मौजे रामराई ता. गंगापुर येथे मयत झालेल्या असून अर्जदार क्र.१ चे वडील व अर्जदार क्र.२ व ३ यांचे आजोबा नामे महादु मारोती शेटे हे यापुर्वीच मयत झालेले आहे. मयत इंदुबाई यांना दोन मुले अर्जदार क्र.१ संजय व गोकुळ महावु शेटे असे होते, त्यापैकी गोकुळ महादु शेटे हे दिनांक २५/१०/२०१५ रोजी मयत झालेला असुन मयत गोकुळ महादु शेटे यांची पत्नी नामे अलका गोकुळ शेटे या दिनांक २७/१२/२०१३ रोजी मयत झालेल्या आहे. मयत इंदुबाई महादु शेटे यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नसुन अर्जदार क्र.१ ची आई व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी नामे मयत इंदुबाई महादु शेटे यांची मौजे वाळुज ता. गंगापुर जि. औरंगाबाद शिवारातील शेत सर्व्हे नं. ३७३ मधील शेत जमिन विशेष भुसंपादन अधिकारी यांनी एम आय डी सी करीता संपादीत केली होती. त्याचा मोबदला म्हणून रोख रक्कम तसेच संबंधीतास एक पीएपी भुखंड मिळण्याकरीता अर्जदारानी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत ✻ प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ३१/१०/२०२५ दिले. प्रकरणात पुढील तारीख २२/१२/२०२५ राजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

सोलापूर तरुण भारत — CHANGE IN NAME

I have change my name from:
SHAIKH ASHFAQUE
To:
SHAIKH ASHFAQUE AYYUB
Address : Near Ashirwad Lodge, Dr.Zakir Husain Nagar, sillod, Aurangabad Maharashtra - 431112

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २६७/२०२५

अर्जदारः १) नालोवाई शंकर राठोड, वय ८५ वर्ष, धंदा-घरकाम, २ दशरथ शंकर राठोड, वय-६५ वर्ष, धंदा शेती, ३ पंडित शंकर राठोड, वय ६४ वर्ष, धंदा-शेती, ४ नथ्थू शंकर राठोड, वय-५८ वर्ष, धंदा शेती. ५ अयाबाई धारासिंग चव्हाण, वय ५४ वर्ष, धंदा घरकाम ६) कैलास शंकर राठोड, वय-५२ वर्ष, धंदा-शेती. सर्व रा. जामठी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर । ७ सकुबाई सुकलाल चव्हाण, वय-५६ वर्ष, धंदा-घरकाम, रा. घाणेगावतांडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदारः-कोणीही नाही

प्रकरणः-वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत शंकर बाळा राठोड हे दिनांक १२/०२/२०१५ रोजी जामठी ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत शंकर बाळा राठोड यांचे वारस असून त्यांना शासकीय कामकाजासाठी, लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १७/११/२०२५

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहास्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २८९/२०२५.

अर्जदारः १) गायत्री भुषण खैरणार, वयः ३२ वर्षे, धंदा घरकाम. २) पुष्कराज भुषण खैरणार, वयः ०९ वर्षे, धंदाः शिक्षण. वरील सर्व अर्जदार रा. गोंदेगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक,

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नागे भुषण राजेंद्र खैरणार हे दितांक २६/११/२०२१ ला मौजे गोंदेगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी. व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र निळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक:- १८/१२/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- ३१/१०/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा.एन.आर. ढोके दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या कोर्टात.**

दि.कि.अर्ज क्र. ५१७/२०२५ — पुढील तारीख, २०/१२/२०२५.

अर्जदार :- १. कांतीकुमार शांतीलाल गंगवाल, वय ८८ वर्षे, धंदा काही नाही, रा. बाजार पेठ. कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ह.मु. श्री साईपुरी कॉलनी, साई राम थिएटर. मलकागिरी, हैद्राबाद ता. व जि. हैद्राबाद. २. महेंद्र शांतीलाल गंगवाल, वय ७४ वर्षे, धंदा व्यापार, रा. बाजार पेठ, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ह.मु. गितांजली कॉम्पलेक्स राम कोटो, ए. पी. वर्धमान बँक, किंग कोटी, नामपल्ली, ता. नामपल्ली, जि. हैद्राबाद, ३. महावीर शांतीलाल गंगवाल, वय ७० वर्षे, धंदा व्यापार. रा. बाजार पेठ, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. संतोष शांतीलाल गंगवाल, वय ६६ वर्षे, धंदा व्यापार, रा. समायक प्लाझा, क्यानॉट प्लेस, सिडको कॉलनी, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ५. सुशिला भ्र. खुशलचंद पहाडे. वय ८३ वर्ष, धंदा घरकाम. रा. टिळक रोड. शुक्रवार वार्ड, मालेगाव, ता. मालेगाव जि. नाशिक. ६. शकुंतला प्रकाशचंद पहाडे, वय ७८ वर्ष, धंदा घरकाम, रा. मुबई गल्ली, अमळनेर, ता. अमळनेर जि. जळगांव.

विरुद्ध

गैरअर्जदार :-निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.एम.एच. सय्यद यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत चंपाबाई भ्र. शांतीलाल गंगवाल यांचे मुले असून अर्जदार क्र. ५ व ६ ह्या मयताच्या विवाहित मुली आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत चंपाबाई भ्र. शांतीलाल गंगवाल यांच कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ६ यांची आई नामे चंपाबाई भ्र. शांतीलाल गंगवाल ह्या दि. २२/११/२००७ रोजा मोजे कन्नड ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. सोबत मयत चंपाबाई भ्र. शांतीलाल गंगवाल यांचे नगर परिषद, कन्नड यानी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसंच मयताचे पती शांतीलाल गंगावाल हे सुद्धा पुर्वीच मरण पावलेले आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांना मयत चंपाबाई भ्र. शांतीलाल गंगवाल यांच्या मृत्यु पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, नगर परिषद, कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत चंपाबाई भ्र. शांतीलाल गंगवाल ह्या मोजे कन्नड, ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाली आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०२/१०/२०२५ रोजी मोज कन्नड ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापूर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाहो अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअथों सदर जाहोर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत त्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तोस (३०) दिवसांच्या आत आपन्ना उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा, मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावं वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक ३०/१०/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपाक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मंगळसूत्र चोरी आणि खिसा कापणारे दोन चोरटे जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

शहर व जिल्ह्यात वाढत्या चोरी-घरफोड्या रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने सुरू केलेल्या मोहिमेत दोन आरोपींना अटक करण्यात आली. दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये एकूण ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बीड स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स.पोलीस निरीक्षक धनराज जारवाल यांच्या पथकाने पाटोदा पोलीस ठाण्यातील गुन्हा नोंद क्र. ३५१/२०२५, कलम ३०३(२) बी.एन.एस. मधील आरोपीचा शोध घेत असताना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार गणेश कचरू पवार रा. आयोध्यानगर, बीड हा आरोपी असल्याची खात्री पटल्यावर पथकाने ३१ ऑक्टोबर रोजी चहाटा फाटा परिसरात त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीचे सोन्याचे मनीमंगळसुत्र किमती ६० हजार रुपये जप्त करण्यात आले. या आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून पुढील तपास पाटोदा पोलीस करीत आहेत.



दरम्यान शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हा नोंद क्र. ५१९/२०२५, कलम ३०३(२) बी.एन.एस. अंतर्गत संशयिताचा शोध घेत असताना स.पोलीस निरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या पथकाने महेश किसन गायकवाड रा. गांधीनगर, बीड यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३५ हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला पुढील तपासासाठी शिवाजीनगर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले.या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स.पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पो.उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, राहुल शिंदे, अंकुश वरपे, अर्जुन यादव, अश्फाक सय्यद, मनोज परजणे आणि सिद्धेश्वर मांजरे यांनी सहभाग नोंदविला.

# आगवान कुटूंबातील तिसरा प्राचार्य रविंद्र वसंतराव आगवान यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**



पारनेरकर महाराज विद्यालयाच्या प्राचार्यपदी निवड झाली. विष्णु रसाळ हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागी श्री.रविंद्र वसंतराव आगवान यांची नियुक्ती झाली.

या पूर्वी आगवान कुटूंबातील राजेंद्र संतुकराव आगवान हे निरगुडी ता.पाटोदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च विद्यालयात १९६८ ते २००१ पर्यंत प्राचार्य होते. तसेच सौ.मंगला संतुकराव आगवान या बीड शहरातील राष्ट्रीय कन्या माध्यमिक विद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून २५ वर्ष काम केले. मांजरसुंबा येथील आगवान कुटूंबातील एकाच घरातील तिघांनी प्राचार्य म्हणून काम केले. श्री.रविंद्र वसंतराव आगवान यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा

# सर्व पेन्शनर्स यांनी दि.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर पर्यंत हयात नामे सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील सर्व पेंन्शनर धारकांनी दि.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ पूर्वी हयात नामे आपल्या संबंधित विभागाकडे सादर करावे असे आवाहन पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन्स असोसिएशनचे प्र.अध्यक्ष इंजि.आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे.

प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, जिल्हा परिषद कडून पेन्शन मिळणारे पेन्शनर्स यांनी त्या-त्या पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी कार्यालयाकडे आणि कोषागार कार्यालयाकडून पेन्शन प्राप्त होणार्या पेन्शनर्सनी संबंधित बँकेच्या (स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र) शाखेत आपले हयात नामे सादर करावेत. हयात नाम्या सोबत आधार कार्ड, बँक आकॉऊंट झेरॉक्स आणि पीपीओ क्रमांक जोडावा असे आवाहन पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन्स असोसिएशनचे प्र.अध्यक्ष इंजि.आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे.

# तुलसी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी संस्था प्रतिनिधी डॉ.प्रियांका रोडे, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश कसबे, तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात सरदार पटेल यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या एकीच्या संदेशाचा वारसा जपण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

# बीडमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथेचे भव्य आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

संत ज्ञानेश्वर महाराज यांची साडेसातशेवी जन्म जयंती सध्या संपूर्ण विश्वभर उत्साहात साजरी होत आहे. गेल्या बारा महिन्यांपासून संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर विविध कार्यक्रमांचे आयोजन देशभर करण्यात येत असून, शासन स्तरावरही हा उत्सव भव्य स्वरूपात साजरा केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर, बीड शहरात



गेल्या पंचवीस वर्षांपासून संत विचार पेरण्याचे कार्य करणारे स्वर्गीय झुंबरलालजी खटोड

**साडेसातशेवी जन्म जयंतीनिमित्त साध्वी अनुराधा दीदींच्या संगीतमय कथेतून जीवनप्रेरणा**

सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने 'संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा' या भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# बीड जिल्ह्यात पुरग्रस्तांसाठी औरंगाबाद धर्मप्रांताकडून अन्नधान्य किटचे वाटप

## जनतेकडून धर्मप्रांताच्या संवेदनशीलतेचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

अतिवृष्टीमुळे गंभीरपणे प्रभावित झालेल्या बीड जिल्ह्यातील पुरग्रस्त कुटुंबांना औरंगाबाद धर्मप्रांताने दिलासा देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या कठीण परिस्थितीत औरंगाबाद धर्मप्रांताचे अधिपती बिशप बर्नार्ड लान्सी यांच्या नेतृत्वाखाली १६५ पुरग्रस्त कुटुंबांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले.





गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान, जनावरे, घरे आणि उपजीविकेचे साधन हरपले आहेत. अशा परिस्थितीत धर्मप्रांताने दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता याबद्दल गावकऱ्यांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

धर्मप्रांताच्या प्रतिनिधीं सेंट रपपी सोशल सेंटर येथे जाऊन पुरग्रस्तांना थेट किट वाटप केले. या किटमध्ये तांदूळ, डाळ, तेल, साखर, आटा आणि इतर आवश्यक वस्तू समाविष्ट होत्या.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, या आपत्तीच्या काळात औरंगाबाद धर्मप्रांताने दाखवलेली माणुसकी आणि तात्काळ मदत आमच्यासाठी मोठा आधार ठरली आहे.या उपक्रमातून औरंगाबाद धर्मप्रांताने पुन्हा एकदा समाजासाठी असलेली त्यांची बांधिलकी आणि सेवा वृत्ती सिद्ध केली आहे. बीड जिल्ह्यातील प्रशासन आणि नागरिकांनी या कार्याचे मनःपूर्वक अभिनंदन आणि कौतुक केले.धर्मप्रांताने दिलेला हा आधार आम्हाला पुन्हा उभं राहण्याचं बळ देतो, असे एका लाभार्थी कुटुंबाने भावनिक शब्दांत सांगितले.

# अंबाजोगाईत रिंग रोडवर अपघात : कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरातील रिंगरोडवरील मानवलोक कार्यालयाजवळ शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या चंद्रकांत मुरलीधर गंगणे (वय ५२, रा. राडी, ता. अंबाजोगाई) यांचा मृत्यू झाला. ते अंबाजोगाई येथील त्यांच्या घराकडे जात असताना हा अपघात झाला.




मानवलोक कार्यालयाजवळ कारने दिलेल्या जोरदार धडकेत ते गंभीर जखमी झाले होते. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ त्यांना 'स्वाराती' रुग्णालयात दाखल केले. मात्र, तिथे डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. चंद्रकांत गंगणे हे रांजणी येथील साखर कारखान्यात चीफ केमिस्ट म्हणून कार्यरत होते. त्यांच्या अकाली मृत्यूची खबर येताच राडी गावावर शोककळा पसरली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा झेंडा फडकविणार-खा.बजरंग सोनवणे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

पक्षासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या प्रामाणिक, निष्ठावान अशा सर्व कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत उमेदवारी व त्यांना ताकद देऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणाने आम्ही उभे राहू. तसेच आगामी निवडणुकीत बीड जिल्हा परिषद, सर्व पंचायत समिती आणि नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चा झेंडा फडकविणार असल्याचा विश्वास बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केला. ते अंबाजोगाईत पक्षाच्या निवडणूक पूर्व आढावा बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालयात खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, तर यावेळी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी आमदार प्रा.संगिताताई ठोंबरे, राजेसाहेब देशमुख आणि डॉ.नरेंद्र काळे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, संजय भोसले, तारेख अली उस्मानी, ॲड.शहाजान पठाण, अंकुश ढोबळे, ॲड.इस्माईल गवळी, दीपक शिंदे, केशव ढगे, भास्कर आगळे, देविदास देवकते, तानबा लांडगे, आश्रूबा करडे, पप्पू माके, ज्ञानोबा कांबळे, रविंद्र मोरे, गणेश घाडगे, चंद्रकलाताई देशमुख, बन्सी जोगदंड, व्यंकटेश चामनर, कल्याण भिसे, मुनीर कुरेशी, सोमनाथ धोत्रे, सुधाकर देशमुख, प्रशांत पवार, अशोक मोदी, कार्याध्यक्ष टेकाळे, सुरैय्याभाभी चौधरी, पप्पू काकडे, दिलीप धुमाळ, धनराज माने, सुधाकर जोगदंड, अशोक जाधव, अन्वर कुरेशी, राजेभाऊ देवकते या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रास्ताविक करताना तालुकाध्यक्ष अमर देशमुख म्हणाले की, आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये तरूणांना ५० टक्के संधी देण्याची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची भूमिका आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी आणि रणनीती ठरविण्यासाठी आज पक्षातर्फे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे राज्यात प्रतिवर्षीप्रमाणे चालू वर्षीही २७ ऑक्टोबर २०२५ ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधी दक्षता जनजागृती सप्ताह २०२५(Vigilance -wareness WeeK) भ्रष्टाचाराला नाही म्हणा राष्ट्रसाठी वचन बध्द व्हा! हा आयोजित करून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे २७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरात भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी वाजता सोपान चिटमपल्ले यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता जनजागृती सप्ताह २०२५चे उद्घाटन हे शपथ ग्रहण कार्यक्रम संपन्न झाला असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# परळीच्या भूमिपुत्राचा प्रशासनात बहुमान: कोकण म्हाडाच्या मुख्य अधिकारी पदी डॉ. विशाल राठोड यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.१ नोव्हेंबर**

प्रशासकीय क्षेत्रामध्ये परळीच्या भूमिपुत्राने विविध मुख्य पदांवर कर्तव्य बजावण्याचा बहुमान मिळवला असून परळीचे डॉ. विशाल राठोड यांची आता तीन वर्षासाठी कोकण विभागाच्या म्हाडाचे मुख्य अधिकारी म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीड़ प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. विशाल राठोड यांच्यावर कोकण विभागाच्या गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाची मुख्य जबाबदारी घेण्यात आली आहे. परळीसाठी ही बहुमानाची बाब असून



या नियुक्ती बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

डॉ. विशाल राठोड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रकल्प संचालक यांची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मुख्य अधिकारी, कोकण गृहनिमर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर ३ वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.याबाबतचा शासनादेश निर्गमित करण्यात आला आहे.परळीचे भूमिपुत्र असलेल्या डॉ. विशाल राठोड यांनी प्रशासनात विविध पदांवर चांगले काम केले आहे. आपल्या उल्लेखनीय कार्याचा ठसा त्यांनी प्रशासनात उमटवलेला आहे. त्यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कामाबद्दल त्यांना विविध पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी /प्रकल्प संचालक म्हणून त्यांनी विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने आता त्यांना तीन वर्षासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणा अंतर्गत कोकण म्हाडाचे मुख्य अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे.त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जन शिक्षण संस्थान बीड येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित व कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा वित्तपोषित जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री , लोहपुरुष उपाधीने संबोधले जाणारे, देशाची एकता व अखंडता अबाधित राहण्यासाठी विशेष कार्य केलेले सरदार वल्लभ भाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीडचे प्रा श्री कृष्णा बारटक्के, चंपावती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा श्री संजय चौंडे व सर्व कार्यकर्ते व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी सरदार वल्लभाई पटेल यांना अभिवादन केले.




बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

## अग्रलेख...

# आंदोलन संपले, आव्हाने कायम

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही देशातील जवळपास अर्धी अधिक टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित उद्योगावर अवलंबून आहे. शेतकरी हा जगाचा अन्नदाता म्हणवला जातो. शेतकऱ्याने शेतात कष्ट करून धान्य पिकवले नाही तर सर्वांनाच उपाशी राहावे लागेल. दुसऱ्याचे पोट भरण्यासाठी शेतकरी स्वत: अनेकवेळा अर्धपोटी वा उपाशी राहतो. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा आणि मेहनतीचा योग्य मोबदला मिळत नाही, हे उघड सत्य आहे. शेती हा बहुधा एकमेव असा व्यवसाय असावा, ज्यात शेतकऱ्याला आपल्या उत्पादनाचा भाव ठरवता येत नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा भाव सरकार वा व्यापारी ठरवत असतात. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. त्यातून शेतकरी कर्जबाजारी होतो, त्याच्यावर आत्महत्येची वेळ येते. देशातील सर्वांत जास्त आत्महत्या शेतकऱ्यांच्या आहेत. तरीही हा वर्ग शांतपणे धरणी मातेच्या पोटात बियाणे पेरत असतो आणि अख्ख्या जगासाठी पिकवत असतो. क्वचितच त्याची अस्वस्थता बाहेर पडते आणि ती तशी नुकतीच बच्चू कडू यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनातून व्यक्त झाली. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आतापर्यंत देशात अनेक आंदोलने झालीत. विविध राजकीय पक्षांनीही शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने केलीत. महाराष्ट्रातील सर्वांत मोठे शेतकरी आंदोलन शरद जोशी यांचे होते. एकेकाळी शरद जोशी यांची शेतकरी आंदोलने महाराष्ट्रातच नाही तर देशात गाजली होती. जगानेही त्यांच्या आंदोलनांची दखल घेतली होती. शरद जोशींच्या आंदोलनाने शेतकऱ्याच्या प्रश्नांची राज्यच नाही तर केंद्र सरकारलाही दखल घ्यावी लागली. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची तसेच हमीभावाची मागणी देशात सर्वप्रथम शरद जोशी यांनी केली. शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी हमीभावाची योजना सरकारला आणावी लागली. शरद जोशी यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना संघटित केले. त्यांच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटले असे म्हणणे धाडसाचे असले तरी ते सुटण्याचा मार्ग मोकळा झाला, यात शंका नाही. शरद जोशी यांची सर्व आंदोलने शांततापूर्ण तसेच अहिंसक होती. त्यांच्या आंदोलनाने सर्वसामान्य जनतेला कधी वेठीस धरले नाही, त्यांना त्रास होऊ दिला नाही. काही वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर झालेल्या आंदोलनांची आणि शरद जोशी यांच्या आंदोलनाची तुलना होऊ शकत नाही. भारतीय किसान युनियनच्या टिकैत बंधूंच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांच्या वेषात खलिस्तानवादी घुसले, अशी चर्चा त्यावेळी झाली होती. शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारने आणलेल्या तीन कायद्यांच्या विरोधात हे आंदोलन होते. खरे म्हणजे मोदी सरकारने आणलेले तिन्ही कायदे शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून तयार करण्यात आले होते. पण टिकैत आणि देशातील अन्य शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करण्याऐवजी अल्पकालीन हिताचा विचार केला. परिणामी मोदी सरकारला हे तीनही कायदे मागे घ्यावे लागले. त्यामुळे सरकारचे काही नुकसान झाले नाही, पण देशातील शेतकऱ्यांचे कायमस्वरूपी नुकसान झाले. शेतकरी नेत्यांनी आपल्या आडमुठ्या भूमिकेमुळे देशातील शेतकऱ्यांच्या पायावर धोंडा पाडून घेतला.

मुळात कोणतेही आंदोलन सुरू करताना मागण्यांसोबत आपल्याला कधी आणि कुठे थांबायचे, याचा विचार होणे गरजेचे असते. आपल्याला कधी आणि कुठे थांबायचे हे माहीत नसेल तर आंदोलन दीर्घकाळ चालविले जाते आणि त्यातून शेतकऱ्यांच्या पदरात त्रास, ससेहोलपट आणि मनस्तापाशिवाय काही पडत नाही. दिल्ली सीमेवर झालेले शेतकऱ्यांचे आंदोलन हे याच प्रकारातील होते. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रात नुकत्याच प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांच्या नेतृत्वात झालेल्या शेतकरी आंदोलनाकडे पाहावे लागेल. सरसकट कर्जमुक्ती आणि शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, या आणि अन्य मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी महाएल्गार आंदोलन पुकारले होते. शेतकऱ्यांचे आंदोलन विदर्भ तसेच महाराष्ट्राला नवे नाही. पण या आंदोलनामुळे कधी नव्हे ते नागपुरातून जाणारे चारही राष्ट्रीय महामार्ग ठप्प झाले. २७ किलोमीटरपर्यंतचा जाम लागला. मुळात बच्चू कडू हे आक्रमक आहेत. आपल्या अभिनव आंदोलनांसाठी ते ओळखले जातात. त्यांनी आतापर्यंत केलेली सर्व आंदोलने अभिनव म्हणावी अशी होती. त्यामुळेच ती गाजलीही. बच्चू कडू यांचे यावेळचे शेतकरी आंदोलनही गाजले. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व यंत्रणांनी समन्वयाची भूमिका घेतल्यामुळे हे आंदोलन चिघळले नाही आणि त्यावर शांततापूर्ण तसेच सर्वमान्य असा तोडगा निघाला. याचे श्रेय महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना द्यावे लागेल. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्या. रजनीश व्यास यांनी घेतलेल्या न्यायोचित भूमिकेमुळे देखील सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला. आंदोलन शांततेने संपण्याचे श्रेय आंदोलनाचे नेते बच्चू कडू व त्यांच्या सहकाऱ्यांनाही द्यावे लागेल. कडू यांनी टिकैत बंधूंसारखी ताठर भूमिका घेतली असती, तर काय झाले असते, याची कल्पना करवत नाही. कोणतेही आंदोलन चिघळले तर त्याची परिणती अश्रुधूर, लाठीहल्ला आणि गोळीबारात होते. यात सरकारचे नाही तर आंदोलकांचे सर्वांत जास्त नुकसान होते. राजकारणात काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे ज्याला समजते, तो खरा नेता मानला जातो. त्याचप्रमाणे आंदोलन करणाऱ्या नेत्याला कुठे आणि केव्हा थांबावे, हे समजते, त्याला नुसता आंदोलनाचा नेताच नाही तर खऱ्या अर्थाने हितचिंतक म्हणावे लागते. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलक आंदोलन करत असतात. कोणतेही आंदोलन लाठीमारात आणि गोळीबारात जखमी होण्यासाठी तसेच प्राण गमावण्यासाठी नसतेच. या आंदोलनात बच्चू कडू यांनी आपला मुद्दा व्यक्तिगत प्रतिष्ठेचा केला नाही. सरकारने आंदोलनस्थळी चर्चेसाठी यावे, असा आग्रह धरला नाही. सरकारच्या निमंत्रणावरून कडू आणि त्यांचे सर्व सहकारी चर्चेसाठी मुंबईला गेले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांची भूमिका नेहमीच त्यांना न्याय देण्याची आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची राहिली. याचा प्रत्यय राज्यातील अतिवृष्टीच्या वेळी आला. अलिकडच्या अतिवृष्टीत फार मोठा तडाखा राज्यातील शेतकऱ्यांना बसला होता. त्यावेळी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी फडणवीस यांनी दिल्लीत धाव घेत राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी घसघशीत मदत आणली. तिचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना मिळाला. त्यामुळे यावेळीही फडणवीस राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतील, त्यांना दिलासा देतील, अशी खात्री सर्वांनाच होती. दोन्ही बाजूंची बैठक झाल्यावर ३० जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन फडणवीस यांनी आंदोलकांना दिले. त्यासाठी एका उच्चाधिकार समितीची स्थापनाही त्यांनी केली. कर्जमाफी हा तात्कालिक उपाय असला तरी भविष्यात शेतकरी कर्जाच्या चक्रात अडकणार नाही, या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. फडणवीस यांचे आश्वासन कधीच कोरडे नसते. फडणवीस जे बोलतात, ते करून दाखवतात, याचा राज्यातील जनतेने याआधीही अनेकवेळा अनुभव घेतला आहे. त्यामुळे यावेळीही शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, याची खात्री देता येते. कर्जमाफी व्हायलाच हवी. ती शेतकऱ्यांची गरज आहे. यापूर्वीही दोन-तीनदा कर्जमाफी झाली. परंतु, शेतकऱ्यांची दैना संपलेली नाही. आता ती संपविण्याच्या दिशेनेही पावले उचलली गेली पाहिजेत. महाराष्ट्रातील सिंचनाचे प्रमाण वाढविणे, वातावरणातील बदलांच्या प्रभावापासून शेती व शेतकऱ्यांना वाचविणे, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व खते वेळेवर उपलब्ध करून देणे, कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करून देणे या साऱ्या गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत. त्यातही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देणे फारच महत्त्वाचे आहे. शेतकऱ्याच्या घरात जोवर अधिकचे उत्पन्न येत नाही, त्याची शेती तोट्यातून नफ्याकडे जात नाही, तोवर त्याची दैना थांबणार नाही, हे आंदोलनकर्त्यांनी आणि सरकारनेही लक्षात घेणे गरजेचे आहे. आंदोलन संपले असले तरी आव्हाने कायम आहेत, हेही त्यांनी ध्यानात ठेवावे.

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# आपण 'भारतीय' कधी होणार?

भारतीय रेल्वे ही जगातील सर्वांत मोठी रेल्वे व्यवस्था आहे. दररोज सुमारे २.३ कोटी प्रवासी तिच्यावर अवलंबून असतात. गंमत म्हणजे ही संख्या ऑस्ट्रेलिया देशाच्या संपूर्ण लोकसंख्येइतकी आहे. पण नुकताच एका विदेशी ट्रॅव्हल व्लॉगरचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यामध्ये ती तरुणी भारतीय रेल्वेतील आपला विचित्र अनुभव सांगताना दिसतेय. ती म्हणतेय की ट्रेनचा डबा अत्यंत अस्वच्छ होता. टॉयलेटमधून दुर्गंधी येत होती. सीटवर बसायलाही जागा नव्हती. प्रवाशांच्या डोक्यावर सामानाचा ढिगारा. अशा परिस्थितीत तिला रात्रभर प्रवास करावा लागला. तिचा हा व्हिडीओ खूपच व्हायरल झाला. पण पुढे ती असंही म्हणाली आहे की, "The trains here are awesome and I didn't have this experience in 2023 when I came it wasn't busy at all! But I guess because it's a Saturday that's why." याचा अर्थ तिने उगाच टीका करावी म्हणून व्हिडीओ केलेला नाही. भारतात यायच्या आधी ट्रेनच्या तिकिट्स बुक करून ठेवा असा सल्लाही तिने दिला आहे. हे अगदी खरं आहे की ही परिस्थिती केवळ भारताची नाही. जगामध्ये अनेक ठिकाणी अस्वच्छता असणार. मात्र भारतीय लोक आपल्या देशाला भारत माता म्हणतात. म्हणून आपली जबाबदारी अधिक वाढते.

पण हे फक्त रेल्वेचं चित्र नाही. अशा गोष्टी अनेक ठिकाणी घडतात. रस्ते, उद्याने, सार्वजनिक शौचालये, अगदी आपल्या घराच्या बाहेरची जागा... अनेक ठिकाणी अस्वच्छता दिसते. स्वच्छता म्हणजे फक्त घर स्वच्छ ठेवणे नव्हे. सार्वजनिक जागा, रस्ते, रेल्वे, बस इत्यादी ठिकाणे आपलं घरच नव्हे का? आपण वसुधैव कुटुंबकम् म्हणतो. किमान आपल्या देशाला तरी आपण कुटुंब मानू. रस्त्यावर थुंकणे, कचरा फेकणे, प्लॅस्टिकच्या पिशव्या टाकणे यात आपल्याला काहीही वावगं वाटत नाही. मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये सकाळी प्रवास करणाऱ्या प्रत्येकाला माहीत आहे की, प्लॅटफॉर्मवर चालताना पायाखाली कचरा, थुंकी, पानांच्या पिचकाऱ्या आपण तुडवत चालतो. पण मुंबई इतकी वेगवान आहे की अशा गोष्टींची पर्वा करत बसायला आपल्याकडे वेळ नसतो. दिल्लीतील प्रदूषणाची गाथा सर्वदूर पसरली आहे. रस्त्यांवर प्लॅस्टिकच्या पिशव्या हवेत उडताना दिसतात. तीर्थस्थळांवर पूजेच्या साहित्याचा कचरा वाहून जातो. ट्रेनमध्ये लोक चालण्याच्या जागेत नमाज पठन करतात. बेशिस्त वागण्याचा आपण ठेका घेतलाय का? किंवा बेशिस्त



वागण्याचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्याला प्रस्थापित करायचा आहे? एका अभ्यासानुसार, भारतात दररोज १.५ लाख टन कचरा निर्माण होतो. त्यापैकी फक्त २० टक्के कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाट लावला जातो. उरलेला कचरा रस्त्यावर, नद्यांमध्ये, समुद्रकिनाऱ्यावर सडत पडतो. हा कचरा फक्त पर्यावरणाचा नाही, तर आपल्या आरोग्याचाही शत्रू आहे. डास, माशा, उंदीर हे सगळे रोगांचे वाहक आहेत. डेंग्यू, मलेरिया इ. आजारांचं मूळ अस्वच्छतेत आहे. पण तरीही आपण बदलत नाही.

शाळेत आपण इतिहास, भूगोल, गणित शिकतो. पण नागरिकशास्त्र हा विषय आपण ऑप्शनला टाकतोय का? जपानमध्ये लहान मुलांना शाळेत कचरा वेचायला शिकवलं जातं. स्वित्झर्लंडमध्ये सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवणं हा प्रत्येकाचा धर्म समजला जातो. पण भारतात? आपण रस्त्यावर कचरा फेकतो आणि मग सरकारला दोष देतो. ''स्वच्छ भारत अभियान'' सुरू झालं तेव्हा सगळे उत्साही होते. पण आज दहा वर्षांनंतर रस्ते तसेच आहेत. कारण अभियान सरकारचं आहे, आपलं नाही, ही आपली धारणा आहे. कोरोना होता तेव्हा रस्त्यावर थुंकल्याने कोरोना पसरतो असं सांगितल्यामुळे काही लोकांनी संयम पाळला होता. तरी काही लोक रस्त्यावर बिनधास्त ''पचाक'' करताना दिसले. आता कोरोनाला आपण पूर्णपणे विसरून गेलोय. त्यामुळे रस्त्यावर, भिंतींवर, ट्रेनमध्ये, बिल्डिंगच्या शिड्यांवर थुंकण्याची परंपरा आपण पुन्हा सुरू केली आहे. आपण इतके करंटे आहोत की आपल्याला देवाचे फोटो लावावे लागतात कारण शिड्यांवर कुणी थुंकू नये म्हणून.

आपण इतके असंवेदनशील आहोत की गर्दीमध्ये धक्का लागला तरी आपण लगेच शिवीगाळ करतो. पण संयमाने 'सॉरी' म्हणायला आपल्याला लाज वाटते, आपला अहंकार दुखावतो. फुटपाथवरून, रॉंग साईडवरून बाईक चालवतो. पण कुणाला त्रास झाला तर आपली चूक असतानाही आपण समोरच्या व्यक्तीच्या अंगावर धावत जातो. जणू बेशिस्त वागणं, संविधानाच्या विरोधात वागणं हा आपला धर्म झाला आहे. आपण आपलं सोयीस्कर जीवन जगतो, पण दुसऱ्याच्या अधिकारांचं काय? तसेच आंदोलन हा लोकशाहीचा भाग आहे. पण आंदोलन करताना सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणं हा देशद्रोह आहे. अनेक पक्ष, संघटना आंदोलन करतात आणि देशाच्या मालमत्तेचे नुकसान करतात, घाण पसरवतात. मग आंदोलन तुम्ही कशासाठी करताय? विचार करा ज्या रेल्वे गाड्या जाळल्या जातात, त्या सामान्य माणसाच्या आहेत. ज्या बसेस फोडल्या जातात, त्या गरीब प्रवाशांच्या आहेत. मग आंदोलन कोणासाठी? स्वतःच्या न्यायासाठी की दुसऱ्यांवर अन्याय करण्यासाठी? उजवे आणि डावे दोन्ही प्रकारचे लोक यावर बोलत नाहीत. काहींना वाटतं की आपणच देशप्रेमी आहोत आणि काहींना वाटतं की आपणच मोठे सुधारक, पुरोगामी आहोत. पण शिस्त हेच खरं पुरोगामित्व आहे आणि खरी देशभक्ती आहे.

आपण फार मोठे देशभक्त आहोत असं म्हणतो. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला ध्वजवंदन करतो. पण दुसऱ्या दिवशी रस्त्यावर थुंकतो. कचरा फेकतो. ट्रेनमध्ये सीटवर पाय ठेवतो. कागदाचे आणि प्लॅस्टिकचे झेंडे रस्त्यावरच टाकतो. ही देशभक्ती आहे की दिखावा? खरी देशभक्ती म्हणजे आपण ज्या देशात राहतो, त्याची काळजी घेतली पाहिजे. देशद्रोह म्हणजे फक्त शत्रूला मदत करणं नव्हे. तर देशद्रोह म्हणजे देशात घाण करणं, नियम मोडणं, दुसऱ्याच्या अधिकारांचं हनन करणं. जर आपण हे थांबवलं, तर देश आपोआप स्वच्छ, सुंदर, सुसंस्कृत होईल. त्या विदेशी व्लॉगरने आपल्याला आरसा दाखवला. मध्ये एक व्हिडीओ व्हायरल झाला होता की एका विदेशीला लोक शिव्या देत होते. कारण त्याला भारतीय शिव्या कळत नाहीत. त्याची मस्करी करत होते. आपला भारत हा विविध परंपरांनी नटलेला आहे. विविध भौगोलिक भागांनी सजलेला आहे. जग किती सुंदर आहे हे लोकांना कळावं म्हणून देवाने भारत बनवला. असं योगी अरविंद म्हणून गेलेत. हा सुंदर देश सुंदर ठेवण्याची आपली जबाबदारी आहे. विदेशी लोकांच्या भारत भ्रमंतीमुळे सुद्धा आपले अर्थकारण चालतंय. म्हणून देशभक्ती किंवा पुरोगामित्व यावर चर्चा करण्याआधी आपन शिस्तीवर चर्चा करायला हवी. आपल्या देशाची प्रतिमा आपल्यामुळे वाईट होणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. संविधान वाचवायच्या बढाया मारून काही होणार नाही. रस्त्यावर घाण करणारा व नासधूस करणारा माणूस संविधानप्रेमी असूच शकत नाही. आपण नावाला भारतीय आहोत. पण खऱ्या अर्थाने आपण भारतीय कधी होणार? जेव्हा आपण रस्त्यावर थुंकणं बंद करू, जेव्हा आपण कचरा डब्यात टाकू, जेव्हा आपण गर्दीमध्ये संयमाने वागू. जेव्हा आपण दुसऱ्याच्या अधिकारांचा आदर करू, तेव्हा आपण खरे भारतीय होऊ.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### अनिल फेकरीकर

# सायबर सुरक्षा जागृतीनंतर पुढे काय?

सायबर गुन्हेगारांनी संपूर्ण जगात आपला वरचष्मा निर्माण केला आहे. यामुळे जगातील प्रत्येक सज्जन माणूस आज फार मोठ्या दहशतीत वावरत आहे. त्याचे बँकेतील पैसेही सुरक्षित राहिलेले नाहीत. अशा स्थितीत सायबर गुन्हेगारांपासून स्वत:ला सुरक्षित कसे ठेवायचे यासंदर्भातील जनजागृती अभियान नागपूर ग्रामीण पोलिसांनी देवलापार, रामटेक, पारशिवनी, सावनेर, वेलतूर, कुही, बुटीबोरी, काटोल, नरखेड, जलालखेडा, बेला, उमरेड, भिवापूर, कन्हान, मौदा, अरोली, केळवद, कळमेश्वर, खापा, कोंढाळी, एमआयडीसी बुटीबोरी या २१ पोलिस स्टेशन अंतर्गत राबविले. या भागात राहणाऱ्या जनतेशी थेट संवाद साधत त्यांना सायबर गुन्हेगारांपासून नेमका बचाव कसा करायचा यावर मार्गदर्शन करण्यात आले. खरोखरच हे अभियान लोकहिताचेच आहे. याबद्दल नागपूर ग्रामीण पोलिसांचे अभिनंदन. पण केवळ अभियान राबवून काम होणार आहे का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. सायबर गुन्हेगार वर्तमानातील पोलिस यंत्रणेपेक्षा दहा पट चाणाक्ष आहेत. शिवाय सायबर गुन्हेगारांवर वचक ठेवण्याचे काम केवळ पोलिसांचे नाही. तर त्यात बँकांचीही काही जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आलेली आहे. सर्व व्यवहार हा बँकांमार्फत होतो. मग सायबर गुन्हेगारांवर वचक ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांवर ढकलणे म्हणजे अन्याय करण्यासारखे होईल.



कमी मनुष्यबळामुळे पोलिस यंत्रणा तणावात वावरत असते. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा अजून बोजा टाकणे न्यायोचित नाही. म्हणूनच सायबर गुन्हेगारी होणारच नाही अशीच फूलप्रूफ यंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज आहे. याकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुढाकार घेत सर्व बँकांना दिशानिर्देश द्यायला हवेत. पैसे पाठविणारा आणि खातेधारकाची परवानगी न घेता रुपये परस्पर वळविणाऱ्या गुन्हेगारांना रोखण्याचे काम बँकांनीही करायला हवे. ऑफलाईन व्यवहार असताना बँकांना विश्वसनीय केंद्र मानले जायचे. मग ऑनलाईन होताच हीच यंत्रणा अविश्वसनीयतेकडे वाटचाल का करीत आहे, यावरही मंथन होणे गरजेचे आहे. समजा एखाद्याच्या खात्यातील पैसे सायबर गुन्हेगाराने वळते केले तर संबंधित बँकेतील कर्मचारी पीडितांना मदत करीत नाहीत. वस्तुत: जसे पैसे वळते झाले तसेच ते बँकांना थांबविण्याचा अधिकार असावा. पण तशी युद्धपातळीवर कारवाई होत नसल्याने सायबर गुन्हेगार लाभात राहतात. अनेकदा गुन्हेगार बाहेर देशात बसून हा गोरखधंदा करीत असतात. आता देशातीलच गुन्हेगारांना पकडणे कठीण असताना विदेशातील आरोपींना कसे पकडणार हाच मुद्दा रक्तदाब वाढविणारा ठरतो.

पारशिवनी येथे दर सोमवारी आठवडी बाजार भरतो. या बाजारात मोबाईल चोरांच्या टोळ्या येतात आणि मिळेल तेवढे मोबाईल चोरून नेतात. ज्यांचे मोबाईल चोरीला जातात त्यांना नेट कॅफेत जाऊन २०० रुपये मोजूनच तक्रार करावी लागते. कारण मोबाईल चोरीस गेल्यावर प्रथमत: एका विशिष्ट वेबसाईटवर माहिती टाकावी लागते. जेणेकरून सीमकार्ड बंद करता येईल. पण याकरिता पोलिसांकडे यंत्रणा नाही का? ते थेट नेट कॅफेत जा आणि तक्रार करा असा अफलातून सल्ला का देतात? यावरही मंथन करावे लागेल. केवळ जनजागृती केल्याने सायबर गुन्हेगारी थांबणार नाही. यावर उपाय म्हणून पोलिसांच्या मदतीला प्रत्येक ठाण्यात दोन सायबर तज्ज्ञांची नियुक्ती करायला हवी. एवढेच नव्हे तर सायबर गुन्हेगारांच्या विरोधात कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. दोन चार सायबर गुन्हेगारांना सार्वजनिक ठिकाणी कडक शिक्षा देण्याचीही गरज आहे. अशावेळी जनतेसह सरकारनेही पोलिसांच्या पाठीशी राहणेही अभिप्रेत आहे. सायबर गुन्हेगार हाती शस्त्र असलेल्या दरोडेखोरांपेक्षाही भयानक आहेत. यामुळे त्यांच्याशी लढणारे पोलिस दलही तेवढेच सक्षम असायला हवे. कुठल्याही कर्मचाऱ्याला तिथे बसवून काम होणार नाही. याकरिता तज्ज्ञ लोकांची मदत पोलिस यंत्रणेला पुरविणे काळाची गरज आहे. तेव्हाच देशातील सायबर गुन्हेगारी संपुष्टात येईल. शिवाय मोबाईल हाताळणाऱ्यांनीही हाती असलेल्या शस्त्राचा योग्य वापर करावा. आलेल्या प्रत्येक लिंकवर क्लिक करण्याचा मोह त्यांनी टाळावा.

९८२२४६८६६०

## निमित्त

### प्रा. डॉ. अजय देशपांडे

# अविचल व प्रेरक संशोधननिष्ठा

**(१ व २ नोव्हेंबरला यवतमाळ येथे ६९ वे विदर्भ साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनानिमित्त...)**

संशोधनास प्रतिकूल वातावरण विदर्भ या प्रदेशाचे एक वैशिष्ट्य आहे तसेच संशोधक व संशोधनग्रंथ यांची अक्षम्य उपेक्षादेखील या प्रांताने अनेकदा केली आहे. पण प्रतिकूल परिस्थिती हीच संशोधनाची योग्य वेळ असते. याची प्रचीती विदर्भातील अनेक संशोधकांनी वेळोवेळी घडवली आहे.


विद्याव्यासंगी थोर संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांच्या आयुष्यातील एक घटना त्यांची आणि लोकनायक बापूजी अणे यांची प्रतिकूल काळातील अविचल संशोधननिष्ठा दर्शवणारी आहे.

१९०६ मध्ये अमरावतीला डॉ. देशपांडे आणि लोकनायक बापूजी अणे यांची पहिली भेट वणी येथील रामभाऊ भागवत यांनी करून दिली. तेव्हापासून या दोघांतील स्नेहबंध कायम होते. पुढे १९२६ मध्ये यवतमाळ येथे शारदाश्रम ही संस्था स्थापन झाली. लोकनायक अणे या संस्थेचे अध्यक्ष आणि डॉ. देशपांडे चिटणीस होते.

१९३८ साली स्वित्झर्लंडमधील झ्युरिच येथे होणाऱ्या जागतिक ऐतिहासिक परिषद आणि बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्यापरिषद या दोन महत्त्वाच्या परिषदांना प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहावयाचे व शोधनिबंध सादर करावयाचे निमंत्रण एक वर्ष अगोदर शारदाश्रम या संस्थेचे चिटणीस डॉ. देशपांडे यांना प्राप्त झाले. पण संस्थेची आणि डॉ. देशपांडे यांचीही पाच हजार रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय परिषदेस जाण्याची आर्थिक परिस्थिती नव्हती. परिषदेचे निमंत्रण मिळाले असले तरी त्यासाठीचा खर्च परवडणारा नाही , मुख्य म्हणजे तेवढ्या रकमेची तजवीज होणे अशक्य आहे असे डॉ. देशपांडे यांनी लोकनायक बापूजींना सांगितले. डॉ. देशपांडे



डॉ. य. खु. देशपांडे



बापूजी अणे



ॲड. द. बा. महाजन

यांच्या अविचल संशोधननिष्ठेविषयी व अविश्रांत संशोधनवृत्तीविषयी अपार स्नेहादर असलेल्या बापूजींनी त्यांना परिषदेस जाण्याची तयारी करा, शोधनिबंध लिहा; पाच हजार रुपयांच्या खर्चाची तरतूद होईल, असे सांगितले. परिषदेला तीन महिने अवधी असताना लोकनायकांनी हजार रुपयांची तरतूद करून देत डॉ. देशपांडे यांना जाण्या-येण्याची तिकिटे व आवश्यक ते साहित्य वगैरे घेण्यास सांगितले. पुढे ऑक्टोबर १९३८ ते एप्रिल १९३९ म्हणजे सात महिने डॉ. देशपांडे यांनी परदेशात राहून संशोधन केले. त्यांचा पूर्ण खर्च पाच हजार रुपये लोकनायकांनी दिला. या प्रवासासाठी दिली येथील भुलाभाई देसाई यांनी सातशे रुपयांचा धनादेश देऊन मदत केली असे लोकनायक सांगत. पण उर्वरित रक्कम लोकनायकांनीच आपल्या परीने उभी केली. डॉ. देशपांडे यांच्या संशोधनाला लोकनायकांची सहृदयी आस्था लाभली होती. हे सारे डॉ. देशपांडे व ॲड. नारायण हूड यांनी लिहून ठेवले, म्हणूनच आज सांगणे शक्य होते.

डॉ. देशपांडे यांनी आयुष्यभर प्राणपणाने प्रचंड संशोधन केले. त्यांनी सुमारे पाच हजार संस्कृत व मराठी हस्तलिखित ग्रंथ, सुमारे दोन हजार मराठी व फारशी ऐतिहासिक कागदपत्रे आणि विविध नाणी, शिलालेख, ताम्रपट, ऐतिहासिक स्थळांची व वास्तू शिल्पांची छायाचित्रे, दुर्मिळ मूर्ती अशी अमूल्य सामुग्री परिश्रमपूर्वक संग्रहित केली. नवी मर्मदृष्टी देणारे विपुल असे मौलिक संशोधन केले.

डॉ. देशपांडे यांचे संशोधन व स्फुट लेखन काळाच्या पडद्याआड जाऊ नये म्हणून संशोधनाप्रति अपार आदर असणाऱ्या प्राचार्य राम शेवाळकर यांनी डॉ. य. खु. देशपांडे यांचा निवडक लेखसंग्रह - यशोधन हा ग्रंथ परिश्रमपूर्वक संपादित केला व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा ग्रंथ १९८८ मध्ये प्रकाशित केला. म्हणून डॉ. देशपांडे यांचे काही संशोधन पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवले गेले.

त्याकाळी यवतमाळसारख्या ठिकाणीही अत्यंत सजगपणे, निष्ठेने, पदरमोड करून संशोधनाचे कार्य सुरू होते. आता त्या साऱ्या संशोधनकार्याचे स्मरण सुद्धा केले जात नाही. १९५३ मध्ये ''विदर्भ संशोधनाचा इतिहास'' हा ग्रंथ आणि ॲड. नारायण नागोराव हूड हे नाव आता विस्मृतीच्या गर्तेत गेले आहे. ॲड. प्र. रा. देशमुख यांनी सिंधु संस्कृती, ऋग्वेद व हिंदू संस्कृती हा १९६६ मध्ये परिश्रमपूर्वक लिहिलेला महत्त्वाचा संशोधन ग्रंथ विस्मृतीत जाण्याआधीच पुनर्मुद्रित करण्याची गरज आहे. ॲड. द. बा. महाजन यांनी परिश्रमपूर्वक व अपार निष्ठेने संशोधन करून ''सिंदखेडकर राजे जाधवरावांची बखर'' हा ग्रंथ सिद्ध करून १९६८ मध्ये स्वत: प्रकाशित केला. एकूण काय तर डॉ. देशपांडे यांच्यापासून आजतागायत यवतमाळ येथे संशोधनाचे कार्य सुरूच आहे. आजही यवतमाळात डॉ. अशोक राणांसारखे अभ्यासक निष्ठेने एकाकीपणे संशोधन करीत आहेत. पण आज विदर्भात संशोधकांना सहकार्य करणाऱ्या सहृदयी, उदार, निष्ठावंत, खंबीर माणसांची आणि संशोधनाची दखल घेत संशोधनकार्याच्या बाजूने आस्थापूर्वक नि:पक्षपणे उभ्या राहणाऱ्या कृतिशील संस्थांची मात्र मोठी उणीव आहे.

९८५०५९३०३०

### निसर्गाचा लहरीपणा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे. कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. आता हेच पाहा ना. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागांत पाऊस सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. अलिकडे ऋतुमान बदलत आहे. कोणत्याच ऋतूची सुरुवात वेळेवर होत नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत संपूर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.



**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### निर्ढावलेल्या मानसिकतेला जबाबदार कोण?

डॉ. संपदा मुंढे ही फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होती. शासकीय रुग्णालयाचा आणि पोलिस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांचा सतत संबंध येत असतो. अपघातात मरण पावलेल्या अथवा खून झालेल्या व्यक्तीचा आपल्याला हवा तसा शवविच्छेदन अहवाल द्यावा म्हणून पैसा आणि मनगटाद्वारे दबाव आणण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो. संपदावरही असाच दबाव आणला गेला. आरोपींना पोलिस कोठडी मिळावी म्हणून फिटनेस सर्टिफिकेट देण्यासाठी आणि शवविच्छेदन अहवालात फेरबदल करण्यासाठी पोलिस दबाव आणत असल्याची तक्रार संपदाने फलटण उपविभागीय पोलिस अधिकाऱ्याकडे केली होती. या तक्रारीत गोपाल बदनेचेही नाव होते. या तक्रारींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाहीच उलट संपदाने आरोपी अनफिट असल्याचे प्रमाणपत्र मुद्दाम दिल्याचे आणि यामुळे आरोपींच्या अटकेस उशीर होत असल्याची संपदाविरुद्ध लेखी तक्रार सातारा सिव्हिल सर्जनकडे फलटण पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी केली. यावरून फलटण पोलिस स्टेशनचे इतर अधिकारी आणि गोपाल बदने कशाप्रकारे संपदाचा मानसिक छळ करीत होते हे लक्षात येते. संपदाने आपल्या तक्रारीत पोलिस स्टेशनमधील कर्मचारीअपशब्द वापरत असल्याची आणि मानसिक त्रास देत असल्याचे लिहिले होते तसेच आपल्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास पोलिसच जबाबदार राहतील असे या तक्रारीची चौकशी करणाऱ्या समितीला लिहिलेल्या चार पानी पत्रात तिने म्हटले होते.

दुर्दैवाने बदनेवर कोणतीही कारवाई झाली नाही. शेवटी संपदाने माहितीच्या अधिकारांतर्गत १३ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना पत्र लिहून काय कारवाई केली अशी विचारणा केली. तक्रारीची वरिष्ठ पातळीवर दखल घेतली जात नसल्याने संपदा मनाने खचली असावी. समाजातील प्रत्येकाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेले पोलिसच जेव्हा अत्याचारी होतात तेव्हा न्याय कोणाकडे मागायचा? सरकारी यंत्रणेतील भ्रष्ट, नीच कर्मचाऱ्यांनी संपदाचा बळी घेतला आहे. गुन्हेगारांशी साटेलोटे असलेल्या समाजकंटक यंत्रणा त्यांच्यासाठी सरसावून पुढे येतात. त्यामुळे आज 'जेल' उद्या 'बेल ' त्यानंतर पुन्हा हाच 'खेल' याची गुन्हेगारांना खात्री असते.

**कल्पना माहूरकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-२९

शनिवार, १ नोव्हेंबर २०२५

### राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे

राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे
राष्ट्रजीवनात जीव जीवनान्त पाहु दे ॥धृ.॥

सोड भोग मोह स्वार्थ देह तुझा झिजो परार्थ
चंदनी सुगंध मंद आसमंत भारु दे ॥१॥

ध्येयभाव जो मनात येउ दे तुझ्या कृतीत
कार्याची कीर्तिध्वजा दुरदेशि फडकु दे ॥२॥

कर्मयोग हा ज्वलंत स्वीकारी तू नितांत दिव्य
तुझ्या हवनातुनि दीपमाळ उजळु दे ॥३॥

नकोत अन्य यज्ञ याग त्याग हाच मान याग
बंदिवान आत्मतेज आज मुक्त होउ दे ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# हिंगोली जिल्हा पोलिस भरती प्रक्रिया पारदर्शक होणार- पोलिस अधीक्षक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**
पुढील काही दिवसांतच हिंगोली जिल्हा पोलिस भरती प्रक्रिया सुरू होणार असून सदर प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नये असे आवाहन पोलिस अध- ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना केले आहे.
येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांची उपस्थिती होती. यावेळी भरतीबाबत बोलतांना कोकाटे म्हणाले की, जिल्हा पोलिस दलात शिपाई या पदासाठी ३७ तर चालक पोलिस शिपाई पदाच्या २७ जागा भरण्यात येणार आहेत. यासाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. दि ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत.
राज्यात ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार प्रत्यक्ष भरती प्रक्रियेला सुरूवात होणार आहे. भरती प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांच्या समक्ष त्यांना मैदानी चाचणीमध्ये मिळाले- ले गुणदान केले जाणार आहे. याशिवाय भरती मैदानावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. मैदानावर उमेदवार व प्रत्यक्ष भरतीसाठी नियुक्त केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. इतर व्यक्ती किंवा कर्मचारी मैदानात आढळून आल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या सोबतच साध्या वेशातील पोलिस कर्मचारी भरतीच्या परिसरात तैनात असणार आहेत. याशिवाय लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडूनही जनजागृती केली जाणार आहे. भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असल्यामुळे उमेदवारांनी कोणाच्याही भूलथापंना बळी पडू नये. याशिवाय भरती प्रक्रियेच्यावेळी उत्तेजक चाचणीचे इंजेक्शन घेणाऱ्यांवरही करडी नजर राहणार असून संशयितांची कुठल्याही टप्प्यावर वैद्यकीय चाचणी केली जाणार असल्याचे पोलिस अध- ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ड्रग्ज फ्रि अभियान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**
सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमि त्त नशामुक्त भारत अभियान समिती अंतर्गत जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती जनजागृतीपर अंमली पदार्थ विरोधी अभियानाचा शुभारंभ समाजकल्याण सहाय्यक आयुक्त तथा प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे यांच्या हस्ते हिंगोली येथे करण्यात आला.
राष्ट्रीय एकता दिनानिमित्त एक भारत, व्यसनम ुक्त भारत हा संदेश देत अधिकारी, कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते, व्यसनमुक्ती चळवळीचे कार्यकर्ते आदींनी सहभाग घेतला. एकता, शिस्त, आणि व्यसनमुक्त समाज घडवण्याचा दृढ संकल्प करण्यात आला.
यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदर्शांप्रम ाणे समाज एकत्र राहून राष्ट्र निर्मिती आणि व्यसनमुक्तीच्या माध्यमातून आरोग्यदायी व सशक्त भारत निर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आव- ाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त तथा प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे यांनी केले. नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक विशाल अग्रवाल यांनी व्यसनमुक्त जीवनाचे म हत्त्व अधोरेखित करत युवकांना समाजहितासाठी अंमली पदार्थ विरोधी, तंबाखूमुक्त जीवनशैली, सकारात्मक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच व्यसनाला नकार-जीवनाला स्वीकार हा संदेश प्रभावीपणे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त येत्या वर्षभरात जिल्ह्यात व्यसनमुक्ती प्रचार आणि प्रसार करण्यात येणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी सांगितले.
याप्रसंगी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य प्रकाशित तंबाखू-तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत नशाबंदी मंडळाच्या कार्यकर्त्या शुभदा सरोदे, मृण्मयी अग्रवाल यांच्या हस्ते पत्रकाचे वितरण करण्यात आले. तसेच अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे, नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक विशाल अग्रवाल, जिल्हाध्यक्ष शुभदा सरोदे, सहशिक्षक परमानंद शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य प्रकाशित तंबाखू-तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत नशाबंदी मंडळाच्या कार्यकर्त्या शुभदा सरोदे, मृण्मयी अग्रवाल यांच्या हस्ते पत्रकाचे वितरण करण्यात आले. तसेच अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेण्यात आली.



**हिंगोली- हिंगोली नगर पालिकेच्या प्रभागाच्या निवडणुकांची चाहुल लागली असून नगर पालिकेने नुकतीच मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात आली असून ही यादी चाळतांना निवडणुकीची तयारी करणारे इच्छुक उमेदवार दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

# उबाठा शिवसेनेचे डॉ रमेश शिंदे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**
उबाठा शिवसेनचे शेतकरी नेते डॉ रमेश शिंदे यांनी मुंबई येथे दि ३१ आक्टोबर रोजी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या प्रवेशामुळे काँग्रेस पक्षाला बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे.
नुकतेच काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिंदे शिवसेनेत मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रवेश केला. त्यामुळे हिंगोली विधानसभेत काँग्रेसला मोठा धक्का बसला होता. जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला गळती लागत असतांनाच उबाठा शिवसेनेचे शेतकरी नेते डॉ रमशे शिंदे यांनी त्यांच्या समर्थकांसह काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेचा उधाण आले आहे. डॉ रमेश शिंदे यांनी त्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांसाठी मोठी आंदोलने केली. मागील काही दिवसांपासून डॉ शिंदे यांना काँग्रेस पक्षात प्रवेश घेण्यासाठी हालचाली सुरू झाल्या होत्या. अखेर ३१ आक्टोबर रोजी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीमध्ये डॉ रमेश शिंदे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी विधानसभा निरीक्षक साहेबराव कांबळे, ॲड सचिन नाईक, जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, माजी नगरस- ेवक अनिल नैनवाणी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. आगामी जिल्हापरिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत डॉ रमेश शिंदे यांच्यामुळे काँग्रेस पक्षाला बळ मिळणार असल्याची चर्चा होत आहे.




## संक्षिप्त वृत्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांना अभिवादन



हिंगोली- सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि इंदिरा गांधी यांची पुण्यतिथीनिमित्त आज त्यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच यावेळी राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना एकात्मतेची शपथ देण्यात आली. येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, नायब तहसीलदार संतोष बोथीकर, सी. आर. गोळेगावकर यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### आ. मुटकुळेंकडून स्मशानभूमीची पाहणी



हिंगोली- येथील कयाधू नदीच्या तीरावर असलेल्या स्मशानभूमीची शनिवारी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी पाहणी केली. यावेळी स्मशानभूमीतील शेड आणि ओटा यांची दुरूस्ती करण्यासाठी तत्काळ गवंड्यांना पाचारण करून काम सुरू करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, पवन उपाध्ये, दिपक निमोदीया, सुभाष लदनिया, व्यास, इंजिनीअर चौधरी आदींची उपस्थिती होती.

### अवैध दारू विक्री,१९ ठिकाणी पोलिसांचे छापे

हिंगोली- दारूबंदी कायद्यांतर्गत हिंगोली पोलिसांनी अवैधदारू विक्री करणाऱ्या १९ ठिकाणी छापे मारून त्यांच्याकडून २० हजार ५९० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत तसेच सहा ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापे मारीत आरोपीतांकडून ११ हजार ३७० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे तर अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघर करणाऱ्या ३० वाहनचालकांविरूध्द कारवाई करीत ३५ हजार २०० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# वंदे मातरम गीत १५० वर्धापन दिन कार्यक्रमाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**
वंदे मातरम गिताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त तालुकास्तरीय कार्यक्रम आयोजनाचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज आढावा घेतला. येत्या ७ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक पार पडली.
या बैठकीमध्ये जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार म ार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त, शिक्षणाधिकारी (प्राथमिक माध्यमि क), जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी (योजना), गटशिक्षणाधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पुरातत्त्व विभागाचे समन्वयक, जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.
जिल्ह्यामध्ये तालुकानिहाय कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये, कौशल्य विद्यापीठ व कौशल्य विकास केंद्र, शासकीय, खाजगी माध्यमि क शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच महिला बचत गट, गडकिल्ले संवर्धन संस्था व विविध सामाजिक संस्थांतील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. या कालावधीत देशभक्तीपर भाषणे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन, सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे विविध कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सर्व विभागांना कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सूचना दिल्या.

# मैदानाचे उत्पन्न लाखोंमध्ये, दुरूस्तीसाठी एक पैसाही नाही



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १ नोव्हेंबर**
येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर दसरा, नुमायश आणि दिवाळीच्या फटाक्यांच्या दुकानांसाठी मैदानाचा वापर करण्यात येतो परंतु नुमायश संपल्यानंतर या मैदानाची झालेली दुर्दशा बघून खेळाडू आणि क्रीडाप्रेमी संतापून उठले आहेत. उत्पन्न लाखो रूपये येऊनही स्वच्छता आणि दुरूस्तीसाठी एक पैसाही खर्च होत नाही.
संपूर्ण मैदानावर मोठमोठे खड्डे, उखडलेली माती, प्लास्टिक व कचऱ्याचे ढिगारे, झाल्याचे चित्र दिसत आहे. दररोज सकाळी वॉकिंगसाठी येणारे ज्येष्ठ नागरिक, तरुण खेळाडू आणि लहान मुले यांना आता मैदानावर पाऊल ठेवणेही कठीण झाले आहे. खेळाडूंनी स्पष्ट शब्दांत संताप व्यक्त केला.दसरा कमिटी लाखो रुपयांचा किराया कमावते. दुकाने, पाळणे, सर्कस, हॉटेल, विक्रेते यांच्याकडून भरमसाट किराया घेतला जातो. पण मैदान उद्धवस्त झाल्यावर दुरुस्तीला एक रुपया खर्च करण्याची त्यांची तयारी नसते! मैदानाकडे पहात सुद्धा नाही.
हे मैदान लोकांचं आहे, त्यांच्या कमाईचं साधन नाही.
स्थानिक खेळाडूंनी आणि क्रीडाप्रेमींनी दसरा कमि टीच्या या बेजबाबदार वागणुकीचा तीव्र निषेध केला आहे. प्रशासनाकडेही आरोप केला जात आहे की त्यांनी मैदानाच्या हानीकडे डोळेझाक केली आहे. स्थानिक खेळाडूंनी स्पष्ट शब्दांत सांगितले.दसरा कमिटी आणि प्रशासन या दोघे दरवर्षी मैदानाचे नुकसान करत आहे.त्याचवेळी खेळाडूंनी प्रशासन आणि दसरा कमिटीला इशारा दिला आहे. मैदानाचे नुकसान सहन करणार नाही. पुढील वर्षी जर पुन्हा नुमायशसाठी हे मैदान दिले गेले, तर तीव्र आंदोलन उभारले जाईल.याच पार्श्वभूमीवर खेळाडूंनी इंजी. सय्यद इम्रान अली यांच्याशी संपर्क साधण्यात आला. इंजी. इम्रान अली यांनी पुढाकार घेत शहरातील खेळाडू आणि नागरिकांना त्रास होऊ देणार नाही. मी स्वतः च्या खर्चाने संपूर्ण मैदान स्वच्छ करून देईन आणि त्याची पूर्वस्थिती आणण्यासाठी प्रयत्न करीन.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेट देत तयार केला अतिवृष्टीचा अहवाल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**
टाटा सामाजिक विज्ञान संस्था व सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनेक गावांना प्रत्यक्ष भेट देत अतिवृष्टीचा अहवाल तयार केला आहे तसेच त्यांना मदतही केली आहे.
सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय यवतम ाळ, टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूर व उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या ६० विद्यार्थ्यांनी दि. १४ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर दरम्यान जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या गावांना भेटी देऊन गावकऱ्यांच्या, शेतकऱ्यांची स्थिती जाणून घेण्यात आली व अशी स्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रस्ताव तयार केला आहे.
हिंगोली जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी व त्यामुळे झालेले नुकसान यांची पाहणी करण्यासाठी वसमत तालुक्यातील कुरुंदा, कोठारवाडी व कोठारी तर कळमनुरी तालुक्यातील सालेगाव, सोडेगाव, रुपुर, कोंढुर, दिग्रस, बेलथर, शेवाळा, डोंगरगाव पूल, रामवाडी, जटाळवाडी, मसोड व शिवणी खू येथे शिवार फेरी व गृहभेटी देऊन ॲपद्वारे माहिती संकलित करून निरीक्षणे नोंदवली आहेत.
अतिवृष्टींमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. तसेच ३० ते ७० टक्के पर्यंत पिकांचे नुकसान झालेले आहे. तर नदीकाठावरील व ओढ्याकाठावरील खरडनी मोठ्या प्रमाणात झा- लेली आहे. डोंगर माथ्यावर असलेल्या जमिनीव- रील ३ ते ७ इंच माती वाहून गे- लेली आहे. एक इंच माती तयार होण्यासाठी २०० ते ३०० वर्ष लागतात.



या वर्षी पाऊस मोठ्याप्रमाणात झालेल्याने गरीब कुटुंबांना अजीम प्रेमजी फाउंडेशन आणि सावित्री जोतिराव सम ाजकार्य महाविद्यालय यांच्या मार्फत ४०० एकल महिला, अपंग, भूमिहीन, अल्पभूधारक कुटुंबांना राशन किट. दिवाळी फराळ आणि औषधाचे वाटप करण्यात आले. तसेच ६० विद्यार्थ्यांनी कोंढुर येथे गावकऱ्यासोबत दिवाळी साजरा केली. प्रत्येक घरात जाऊन त्यांची स्थिती जाणून घेतली. कोंढुर गावातील ५ विधवा महिलांना लक्ष्मी मानून त्यांना साडी, चोळी देऊन लक्ष्मीपूजन साजरे केले.
समारोपीय कार्यक्रमात माजी उपशिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, या वर्षी अतिवृष्टी मोठ्याप्रम ाणावर झालेली असून शेतकऱ्यांनी काळी दिव- ाळी साजरी केली आहे. निसर्गासोबत सर्वांनी जगायला पाहिजे त्यासाठी निसर्ग संवर्धन करावे असे त्यांनी सांगितले. वकील संघ अध्यक्ष ॲड. रणधीर तेलगोटे यांनी सांगितले की मानवी सृष्टी निसर्गाच्या सानिध्यात निर्माण झाली व वाढली पण विकास करताना निसर्गाच्या विरोधात जाऊन करतो त्यामुळे वातावरणीय बदल होत आहेत. प्रा. घनश्याम दरने यांनी आपत्ती व्यवस्थापन पथक हे प्रत्येक वर्षी विविध ठिकाणी जाऊन मदतीचे कार्य करते. स्थानिक लोकांना सहाय्य देऊन समुपदेशनाचे कार्य सुद्धा करते.
जयाजी पाईकराव यांनी उगम संस्था अतिवृष्टी ग्रस्त कुटुंबांना आपत्कालीन मदत पुरवित आहे. तसेच एक प्रस्ताव तयार करून अशी परिस्थिती का निर्माण होते व उपाय योजना काय असतील याचा प्रस्ताव उगम संस्था करणार असल्याचे त्यांनी सांगितले. हा अभ्यास दौरा प्रकल्प संचालक दिशांत पाईकराव, कार्यक्रम व्यवस्थापक विकास कांबळे, धनंजय पडघन, सिद्धार्थ निनुले, अमोल माहोरे, भीमराव पाईकराव, राम खंदारे, अमोल माहोरे, भीमराव भिसे, ओंकार भालेराव, सुमेध हरणे, डॉ संदीप घुगे, भूषण पातोडे व विजय पवार यांनी नियोजन व मार्गदर्शन केले.

तरुण भारत

# छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

● महाराष्ट्र आणि शीख धर्म यांचा अनुबंध १७०८ मध्ये गुरु गोविंद सिंगजी यांच्या नांदेड येथील वास्तव्यापासून दृढ झाला, या मुळे हजूर साहिब हे प्रमुख केंद्र बनले. महाराष्ट्रातील शीख समुदायाचे दोन प्रमुख प्रवाह आहेत. दख्खनी शीख (शिकलकार, बंजारा) जे स्थानिक संस्कृतीत मिसळले आणि दुसरे काळाच्या ओघात नंतर स्थायिक झालेले पंजाबी शीख! या दोन्ही समूहांमध्ये 'एक ओंकार' या मूलभूत श्रद्धेमुळे आणि 'गुरू ग्रंथ साहिब'च्या समतेच्या शिकवणुकीमुळे एकता आहे. लंगर आणि नांदेडचे तख्त हे या एकीकरणाचे उत्तम प्रतीक आहेत.

## गुलदस्ता

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**

# देवी लक्ष्मीचे आसन कमळ



दीपावलीचा उत्सव नुकताच संपन्न झाला. फटाक्यांच्या आतषबाजीसह लक्ष्मीपूजन घरोघरी उत्साहात करण्यात आले. याच श्रीलक्ष्मीचे आसन कमळ हे फूल आपल्या 'गुलदस्ता'मधील पुष्प! भारतीय कमळ या जलवनस्पतीला 'लक्ष्मी कमळ' असं म्हणतात. या वनस्पतीची जातकुळी नेलुंबो असून भारताचे राष्ट्रीय फूल आहे. सुबक आणि अतिशय सुंदर दिसणारे कमळाचे फूल गोड-उथळ पाण्यात वाढते, बहरते. गुलाबी, पिवळा आणि पांढरा अशा विविध रंगात बारमाही फुलते. या फुलाचे वैशिष्ट्य असे की, वाटीच्या आकाराएवढे असलेले कमळाचे पान, देठ आणि फूल पाण्याच्या वर किमान दोन ते तीन फूट उंच वाढते. भारताशिवाय चीन आणि जपानमध्येही ही वनस्पती मोठ्या प्रमाणात उगवते. ऑस्ट्रेलियापर्यंत कमळाचा प्रसार झाला आहे. साधारणपणे मार्च ते सप्टेंबर या काळात या फुलांचा हंगाम असतो.

विविधरंगी कमळाच्या फुलांत पांढरं कमळ हा अधिक सामान्य प्रकार समजला जातो. फुलांचा व्यास प्रामुख्याने ८ ते १२ इंचपर्यंत असतो.

संस्कृतमध्ये पद्म आणि मराठीत सरोज, पंकज तर इंग्रजीत इंडियन लोटस अशी नावं असलेले कमळाचे रोप कमी ऑक्सिजन असणाऱ्या दलदलीतसुद्धा चांगल्या प्रकारे वाढते. परागीभवन झाल्यावर त्यावर प्रथम हिरव्या रंगाच्या बिया येतात. पूर्ण परिपक्व बिया काळपट शेंगदाण्याएवढ्या असतात.

याच बियांना कमळगठ्ठा म्हणतात. या कमळगठ्ठ्याच्या मणींचा जपमाळेत वापर केला जातो. प्राचीन काळापासून लक्ष्मीचे प्रतीक म्हणून या मण्यांना मान्यता आहे. कमळाचे सर्व भाग खाण्यायोग्य असून त्यांचा आयुर्वेदिक औषधे बनवण्यासाठी वापर होतो. तलाव किंवा स्थिर जलाशयांमध्ये फुलणारे कमळाचे फूल सरासरी १.५ सेमी लांब आणि ३ मीटर परिसरात पसरलेली आढळून येते. यांच्या पानांचा सरासरी व्यास ०.६ सेंमी तर फुले ०.२ मीटर असते. २५ ते ३० च्या संख्येत या फुलांच्या पाकळ्या असतात. कमळ केवळ फूल नसून अध्यात्म, फलदायीपणा, संपत्ती, ज्ञान आणि प्रकाश यांचे प्रतीक आहे. देशाचे राष्ट्रीय फूल असल्याकारणाने राष्ट्राची संस्कृती, इतिहास आणि वारसा या फुलामुळे जपला गेला आहे.

गलिच्छ पाण्यात वाढूनही कमळ आपली शुद्धता टिकवून ठेवते. म्हणूनच चिखलात असूनसुद्धा आपल्या जीवनात असण्याने त्याचे महत्त्व अबाधित राहते. चिखलयुक्त तलावाच्या पृष्ठभागावर कमळाचे फूल पाहणे हे एक आनंददायी दृश्य आहे. सुमारे २५ ते ३० डिग्री सेंटिग्रेड तापमानात राहून किमान सहा तासपर्यंत सूर्यप्रकाशात कमळाच्या बिया ओलसर जमिनीत उगविल्या जातात. म्हणजेच तावूनसलाखून तयार झालेल्या बिया ऊबदार हवामानात, गढूळ पाण्यात वाढण्यासही सक्षम होतात. पान, देठ, मुळं पाण्याखाली असली, तरी फूल उजागर होऊन पाण्यावर सुंदररीत्या लहरताना आपल्याला दिसतं.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रतीकात्मकतेशी जोडलेले कमळाचे फूल त्यांच्या शांत सौंदर्यासाठी लोकप्रिय ठरले आहे. कमळ हे एक असे फूल आहे, जे देवत्व आणि सौंदर्याचे प्रतीक आहे. कमळ देवी लक्ष्मी आणि भगवान विष्णू यांचे आसन आहे. गुलाबी कमळ आध्यात्मिक उत्क्रांतीचे तर पांढरे कमळ शुद्धता आणि शांततेचे प्रतीक आहे.


## Math Puzzle

Guess the missing numbers.

| | | |
|---|---|---|
| 4 | 64 | 8 |
| 3 | 81 | 9 |
| 6 | ? | ? |

## अंक जाल

सोबत दिलेले अंकच या सारणीत लिहून हे अंक जाल पूर्ण करा !



अंक संकेत

04
35
35
35
45
54
81
81
81 017 246 717
89 210 246 790
92 230 632 790
98 246 636 790

## प्रश्नसंच - ३६



तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!

**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच क्र. ३५ चे भाग्यवान विजेते

सुहास खर्डीकर, प्रसाद कुंटे, आरती देशपांडे, संध्या चावडीपांडे, आल्हाद टोंगळे, विद्या पळसोदकर, सर्वेशा खेडकर, प्रतिमा गोरे, डॉ.दीप्ती काशीकर, डॉ.स्वाती कुळकर्णी, डॉ.क्षमा डोरले, अर्णव डोरले, हरिभाऊ वानखेडे, वसुधा सुवर्णपाठकी, स्मिता खर्डीकर, हेमकांत देशपांडे, दीपमाला तळपते, मीनल तुळणकर, जयंत भारत, उज्वला फिरके, प्रतिमा गोरे, अपर्णा जोशी, वंदना जोशी, शिवशक्ती साखरे, सुनिता सोनारे, श्रध्दा भारत, प्रीतिलता वखरे, शैलजा देशपांडे, सुचिता जोशी, मनिषा सावजी, निलम पांढरीपांडे, आशारानी सुतार, विजया कुलकर्णी, माधुरी बंडबुचे, करूणा कुलकर्णी, सुलोचना येवले, छाया कुलकर्णी, अरूंधती फडके, प्रियांका मालशे, रंजना कुळकर्णी, सुरेखा वाणी, अनघा बिराजदार, नीरजा धामणगांवकर, नीता कुलकर्णी, साक्षी पांडे, शोभा कुलकर्णी, जयश्री डोरले, सुचिता जोशी, शर्वरी परब

**प्रश्नसंच ३५ उत्तरे** **१) उमानाथ २) देऊळ व मशीद ३) पांडव ४) प्रवरा ५) वेदांवरी ६) आषाढी नवमीला ७) हरी ८) नरसिंगजी महाराज ९) समाजहितासाठी १०) खंडेराव गद्रे**

### ग्रंथातील शब्द ओवीत लिहा

**१) तो वेडावाकडा प्रकार। कशास बोलू साचार। गटाराचे उघडिता...।घाण मात्र सुटते हो ॥**
अ) मुख ब) द्वार क) झाकण ड) दरवाजा

**२) त्याचा भगवंत...। आहे सर्वदा खेळता। वेदान्त्यांचे ऐसे मता। दगडांमाजी काय आहे ?**
अ) डोळ्यात ब) मुखात क) समोरासमोर ड) हृदयात

**३) ...सूर्यनारायण। तायासी दीपस्तंभ कोठून। प्रकाश देऊ शकेल जाण। प्रतिकार करण्या तमाचा ॥**
अ) सविता ब) भास्कर क) दिवाकर ड) मित्र

**४) अरे ... पुरुषाप्रत। ऐशी संकटे येतात। वरच्यावर जाण सत्य। त्याची चिंता वाहू नको ॥**
अ) आळशी ब) कार्यालयीन क) कामकर्त्या ड) खोटारड्या

**५) माझे काही महत्त्व नाही। ते अवघे तुझ्या ठायी।...किंमत येई। जगी सुत्राकारणे॥**
अ) ऐश्वर्यामुळे ब) पुष्पामुळे क) धनामुळे ड) ज्ञानामुळे

**६) जो सर्व संतांचा... साचा । जो कल्पतरू भक्तांचा। कमलनाभसर्वेश्वरे॥**
अ) ध्येयविषय ब) लक्ष्यविषय क) भेदविषय ड) रुचीविषय

**७) वस्त्ररूपी कुंडाठायी। जरी हा ठेविला असता पाही। तरी हरकत नव्हती काही। सर्वांस... होते ते ॥**
अ) सौहार्द ब) सुखद क) अलंकारिक ड) आनंददायक

**८) ते ज्योतिर्लिंग मनोहर । करी पातकांचा संहार। नको करूस आता उशीर। जाऊ...॥**
अ) भागिरथीस्नानाला ब) गंगास्नानाला क) अलकनंदास्नानाला ड) गोदावरीस्नानाला

**९) मी मुळीच...दीन । कोठून घडावे मला पुण्य? आम्हा कावळ्याकारण। लाभ केली मानसाचा॥**
अ) गरीब ब) दलित क) दरिद्री ड) हीन

**१०) कंठामाजी पुष्पहार। नैवेद्याचे नाना प्रकार। दक्षिणेशी... रूपये। त्याने ठेविले ॥**
अ) दहा ब) शंभर क) हजार ड) दहा हजार

## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२**

# मुसाच्या करामती

### भाग १७



बालमित्रांनो, तुम्हाला आफ्रिका खंडाबद्दल काय माहिती आहे? आफ्रिका खंडात खूप वेगवेगळे देश आहेत. तिथे आदिवासी जमातीतले लोक गुण्यागोविंदात रहातात. दक्षिण आफ्रिकेतील देश, त्यामानाने प्रगत आणि पुढारलेले आहेत. मात्र, बराचसा भाग जंगलांनी व्यापला आहे. जंगलात जगातले अनेक दुर्मिळ प्राणी, पक्षी अगदी घोळक्याने रहातात. त्यांना पहाण्यासाठी, जंगलात जगातले प्रवासी इथे येतात. 'आफ्रिकन सफारी'चा आनंद लुटतात.

तर अशा आफ्रिका खंडात 'सेशेल्स' नावाचा अगदी चिमुकला देश आहे. तिथे घडलेली ही गोष्ट आहे. खूप वर्षांपूर्वी सेशेल्समधील एका जंगलात, झुलू नावाचा लाकूडतोड्या आणि त्याची डिम्फो नावाची बायको, टुमदार झोपडीत रहात. झुलू जंगलातली लाकडं तोडून, त्याच्या मोळ्या बांधून शहरात विकायला घेऊन जात असे. त्या काळात, घरोघरी इंधनासाठी लाकडाचा वापर केला जात असे. त्यामुळे झुलूच्या लाकडाला शहरात मागणी असे. झुलू आणि डिम्फो मिळेल त्या पैशात सुखासमाधानाने रहात.

कडाक्याची थंडी पडली होती. झुलू आणि डिम्फो शेकोटी पेटवून शेकत बसले होते. डिम्फो म्हणाली,'आपल्याला देवानं इतकी सुखं दिली आहेत. पण, एखादं मूल का नाही दिलं? आपल्या आसपासचे सगळे शेजारी, आपल्या मुलाबाळात किती मजेत वेळ घालवतात. अगदी छोटंसं म्हणजे अगदी हाताच्या पंजाएवढं बाळ मला मिळालं तरी चालेल. मी त्याला प्राणापलिकडे जपेन पण, मला माझं हक्काचं बाळ हवं आहे.' झुलूनं मान हलवून, डिम्फोच्या बोलण्याला दुजोरा दिला.

देवाला दया आली, त्यानं या जोडप्याला अगदी छोटंसं म्हणजे हाताच्या पंजाएवढं बाळ दिलं. नाकी डोळी नीटस्, अंगानं सशक्त, रूपानं गोंडस असं ते बाळ होतं. उंची सोडली तर त्यात कुठलीच कमतरता नव्हती. त्याला पाहून झुलू आणि डिम्फोला अत्यानंद झाला. त्यांनी त्याचं नाव 'मुसा' म्हणजेच राजा ठेवलं. 'आपला मुसा, इवलासा दिसत असला तरी अकलेनं खूप तेज आणि शहाणा, समजूतदार आहे हं,' डिम्फो म्हणाली.

'हो, अगदी छोट्या छोट्या गोष्टीतून त्याची हुशारी दिसते. शिवाय, आपल्या दोघांवर त्याचा जीव आहे आणि आपली काळजीसुद्धा आहे,' झुलू म्हणाला. 'हो नं, परवा भाजी चिरता चिरता माझ्या बोटाला कापलं. तर मुसानं पटापट वर चढून हळदीचा डबा शोधून काढला. त्यातून हळद काढून, माझ्या जखमेवर दाबून धरली. थोड्या वेळात रक्त येणं थांबलं. गुणाचं आहे बाळ माझं,' डिम्फोनं सांगितलं.

दिवसामागून दिवस चालले होते. झुलू आणि डिम्फो, प्राणापलिकडे मुसाला जपत होते. मुसा वयानं मोठा झाला असला तरी उंचीनं मात्र तेवढाच अगदीच हाताच्या पंजाएवढाच राहिला होता. त्या दिवशी सकाळी झुलू गडबडीत होता. शहरात जाऊन खूप लाकडं द्यायची होती. झुलूनं रात्रीच लाकडं फोडून त्याच्या मोळ्या बांधून घोडा गाडीत ठेवल्या होत्या.'डिम्फो, मला उशीर होतो आहे. आपल्या गाडीला घोडे जोडायलासुद्धा वेळ नाहीये. आपला मुसा इतरांच्या मुलांसारखा असता तर घोडे, गाडीला जोडून माझ्या मागे आला असता.' झुलू म्हणाला, 'माझ्या कामाला हातभार लावला असता तर आपल्याला जास्त पैसे मिळाले असते. आपल्या म्हातारपणाची काळजी मिटली असती. असो, मी निघतो.'

'पाऽऽ तुम्ही काही काळजी करू नका. मी घोडागाडी घेऊन तुमच्या मागोमाग येतो,' मुसा म्हणाला.

'कसं शक्य आहे बाळा? तू तर घोड्याच्या पायांपर्यंतसुद्धा पोहचणार नाहीस?' झुलूनं उत्तर दिलं.'एकदा प्रयत्न तर करून पहा! मी घोड्याच्या कानात बसेन आणि आज्ञा देईन. गाडी घेऊन अगदी वेळेत पोहचेन. निघा तुम्ही! मी आणि घोडा गाडी, तुमची खाण्याची शिदोरी घेऊन निघतोच, लगेच,' मुसा म्हणाला.

झुलू लगबगीनं पायी निघून गेला. 'मा, तू पासाठी शिदोरी तयार कर आणि गाडीला घोडा जोडून दे. मला घोड्याच्या कानात बसव. मला सगळा रस्ता माहीत आहे. मी व्यवस्थित घोड्याला आज्ञा देईन,' मुसा म्हणाला. 'गुणी माझं बाळ ते. किती शहाणं आहे. मी देते हं बाळा शिदोरी करून,' डिम्फोनं पटापट स्वयंपाक सुरू केला. 'मा ऽऽ मला वाटतं, मी आता वयानं मोठा झालो आहे. तुमच्या दोघांच्या खर्चपाण्यासाठी काही तरी युक्ती करायला पाहिजे. तुम्हाला भरपूर सोनंनाणं मिळवून आणून द्यायला पाहिजे. तुमच्या म्हातारपणाची सोय करायला हवी आहे,' मुसा पुटपुटला.

घोड्याच्या कानात बसून, तो घोड्याला आज्ञा द्यायला लागला. रस्त्यावरून दोन वाटसरूंनी पाहिलं की, घोडागाडी कुणीही न चालवता आपोआप चालली आहे. दोघं घाबरले. इतक्यात त्यांना आवाज आला,'हळू...जास्त जोरात पळू नका.'

मुसाची उंची जरी वीतभर असली तरी त्याचा आवाज, चांगला खणखणीत होता. 'ही काय भुताटकी आहे,' असं वाटून ते वाटसरू घोडागाडीच्या मागे पळत गेले.

शेवटी झुलू ज्या ठिकाणी आपल्या लाकडी मोळ्यांचा सौदा करत होता, तिथे मुसानं घोड्याला थांबण्याची आज्ञा केली.

'मी आपली घोडागाडी घेऊन आलो आहे. पा मला आता खाली उतरवा,' मुसाचा आवाज आला. झुलूनं घोड्याच्या कानात बसलेल्या मुसाला अलगद खाली उतरवलं आणि खाली ठेवलं. त्या वीतभर मुसाला पाहून, दोघा वाटसरूंना आश्चर्याचा धक्काच बसला.'हा छोटा मुसा आपल्याला मिळाला तर आपण त्याला घेऊन भरपूर खेळ करू शकू. आपलं नशीब फळफळेल,' असा विचार करून ते वाटसरू झुलूजवळ गेले. मुसा झुलूच्या खांद्यावर बसला होता. 'हा छोटा मुलगा आम्हाला द्या महाशय! त्याच्या बदल्यात आम्ही तुम्हाला भरपूर पैसे देतो. हे पहा,' एका वाटसरूने आपल्या खांद्यावरच्या पिशवीतले पैसे झुलूला दाखवले.

'मूर्ख माणसांनो, लाज नाही वाटत असं बोलायला? माझ्या आणि माझ्या बायकोच्या काळजाचा तुकडा आहे हा! जीझस आला तरी मी त्याला देणार नाही. जा चालते व्हा,' झुलू चिडून ओरडला.

'पा ऽऽ त्यांचं म्हणणं ऐका. त्यांच्याकडून पैसे घ्या. मला त्यांच्याकडे सोपवा. मी त्यांना चकमा देऊन, परत तुमच्याकडे येतो. तुम्हाला सोडून मी कुठेही जाणार नाही. माझ्यावर विश्वास ठेवा,' मुसा त्याच्या कानात कुजबुजला. शेवटी हो ना करता करता झुलूनं पैसे घेतले आणि जड अंतःकरणाने मुसाला त्यांच्या स्वाधीन केलं. एका वाटसरूनं मुसाला आपल्या हातात धरलं. त्यांच्या बोलण्यावरून मुसाला कळलं,'त्याला घेऊन ते गावोगाव हिंडणार आणि त्याला वेगवेगळे खेळ करायला लावून, भरपूर पैसा कमावणार,' मुसाला खूप राग आला. अंधार पडायला लागला. 'मला थोडा वेळ खाली जमिनीवर ठेवा. मी अगदी कंटाळून गेलो आहे,' मुसा ओरडला. वाटसरूंना त्याची दया आली. जवळच्या छान नांगरलेल्या शेतावर त्यांनी मुसाला उतरवलं.

खाली उतरता क्षणीच मुसाने पळायला सुरूवात केली. पळताना तो एका विहिरीत पडला. ते उंदराचं बीळ होतं. मालक मुसाला इकडे तिकडे शोधू लागले. आधीच अंधार आणि त्यात मुसा उंदराच्या बिळात लपल्यामुळे त्यांना सापडला नाही. शेवटी स्वतःच्या मुर्खपणाला दोष देत दोघं तिथून निघून गेले. मुसा हळूच बिळाच्या बाहेर पडला. 'काय भयानक रस्ता आणि केवढे मातीचे ढिगारे' असं म्हणत मुसा सावकाश चालत राहिला. अखेर त्याला मोठ्या गोगलगाईचं रिकामं घर सापडलं. तिथे जाऊन तो झोपला. मध्यरात्री त्याला जाग आली. त्याच्या कानावर दोन चोरांचा आवाज पडला.

'आपण या श्रीमंत माणसाच्या घरातला पैसा अडका, सोनं नाणं सारं चोरायचं,' ते आपापसात बोलत होते. मुसाच्या लक्षात आलं, हे चोर आहेत. चोरी करण्यापासून यांना रोखलं पाहिजे. 'मी सांगू का तुम्हाला?' मुसानं विचारलं.

चोर चपापले. त्यांना भुताटकी वाटली. दिसत कोणी नाही पण, आवाज तर येतोय. 'कोण बोलतंय?' त्यांनी विचारलं. 'जमिनीवर चाचपून पहा, मी अगदी छोटासा, जेमतेम वीतभर तुम्हाला सापडेन,' मुसा म्हणाला. एका चोरानं त्याला आपल्या हातात घेतलं.

'मी खिडकीच्या गजातून आत जाईन आणि तुम्हाला हव्या असलेल्या वस्तू खिडकीतून खाली फेकत जाईन. त्या तुम्ही गोळा करून तुमच्या पोत्यात भरा,' मुसानं डोकं लढवलं. चोरांनी खिडकीच्या गजातून मुसाला आत सोडलं. 'खिडकीच्या खालीच सोन्याच्या नाण्यांनी भरलेल्या थैल्या आहेत. त्यातली नाणी तू खाली फेकत रहा.' मुसा जीव एकवटून ओरडला,'किती नाणी बाहेर फेकू? तुम्ही तयार आहात नं?' मुसाची मूर्ती जरी लहान असली, तरी त्याचा आवाज भारदस्त, दमदार होता. खजिन्याच्या शेजारच्या खोलीत मालक झोपला होता. मुसाच्या आवाजानं तो उठला. आपल्या नोकरचाकरांना त्यानं उठवलं. घराच्या आजूबाजूला पिटाळलं. दोन्ही चोर पळून गेले. मालक खजिन्याच्या खोलीत आल्यावर मुसानं, त्याच्या खांद्यावर उडी मारली. चोरीबद्दल सांगितलं. 'माझ्यामुळे, तुमची सारी संपत्ती वाचली. आता कृपा करून, मला माझ्या मा आणि पा कडे पाठवा,' त्यानं विनवलं. मालकानं बरीच संपत्ती देऊन, घोडागाडीतून मुसाला मिरवत त्याच्या घरी नेलं. झुलू आणि डिम्फो, मुसाची वाटच पहात होते. 'तुमचा मुसा खूप गुणी आणि समंजस आहे. त्यानं इतकी संपत्ती मिळवून आणली आहे की, तुम्हाला म्हातारपणाची चिंता करावी लागणार नाही,' मालकानं सांगितलं. मुसानं आपल्या पा च्या खांद्यावर उडी मारली.

'आलं गं माझं कोकरू... हे बघ, आता असली साहसी कृत्यं करायची नाही. आम्हाला सोडून कुठे जायचं नाही,' त्याच्या छोट्याशा पाठीवरून हात फिरवत डिम्फो म्हणाली. मुसाच्या अंगावर बोटभर मास चढलं. सगळा आनंदी आनंद झाला.

## वारसा

**प्रवीण अविनाश योगी/ ७५०७४ ९३११२**

# श्रीमद् रायगिरौ

### (पूर्वार्ध)

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात माणसानं जगावं कसं, याचा एक वस्तुपाठच निर्माण केला. कोकणातील एका सामान्य डोंगराला त्यांच्या वास्तव्यामुळे एका तीर्थाचे स्वरूप प्राप्त झाले. अवघा रायगडच शिवतीर्थ झाला. 'राजधानी रायगड' डोळे भरून पाहताना शिवरायांचे कर्तृत्व, थोरवी आणि वेगळेपण प्रत्ययास येते. पुरुषार्थ आणि पराक्रमाचं 'दुर्गराज रायगड' हे स्मारक आहे.

१६६६ साली महाराज आग्र्याहून सुटून आल्यावर त्यांनी राजधानी राजगडावरून अन्यत्र हलविण्याचा विचार सुरू केला. मिर्झाराजे जयसिंगच्या स्वारीच्या अनुभवातून महाराजांना राजगड राजधानीच्या दृष्टीने गैरसोयीचा व असुरक्षित वाटू लागला म्हणून त्यांनी स्वराज्याच्या राजधानीसाठी अधिक सुरक्षित स्थान निवडण्याचे ठरविले. रायगड कोकणात आहे. अवघड जागी आहे. वर राजधानीसाठी आवश्यक अशा सपाटीची विस्तीर्ण जागा आहे. डोंगरी किल्लाअजूनही सर्व बाजूंनी सुटावलेला आहे. डोंगराचे कडे उंचच्या उंच आहेत. तसा तो अभेद्य आहे. शिवाय समुद्रालाही जवळ आहे. त्याकाळची पश्चिम किनाऱ्याची स्थिती पाहता स्वतःचे आरमार विकसित करणेही महाराजांना आवश्यक होते. त्या दृष्टीने समुद्रानजीक असलेला रायगड त्यांना राजधानी म्हणून वसवण्यास योग्य वाटला असावा. महाराजांच्या राज्याभिषेकानंतर रायगडाला आगळेच महत्त्व प्राप्त झाले पण तोपर्यंत तरी अभेद्यता हाच त्या गडाचा खरा महिमा होता.

हेन्री ऑक्झिंडन हा इंग्रज वकील राज्याभिषेकाच्या वेळी जून १६७४ मध्ये गडावर आला होता तो म्हणतो,'फितुरी खेरीज हा गड अभेद्य असून कोणाचे ताब्यात जाण्याचा संभव नाही.' टॉमस निकल्स म्हणतो,'वाटेत दरवाज्याजवळ (महाद्वार) पायऱ्या पक्क्या खडकात खोदलेल्या आहेत. जेथे टेकडीस नैसर्गिक अभेद्यता नाही तेथे २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. चाळीस फुटावर दुसरी भिंत बांधून किल्ला इतका अभेद्य बनविला आहे की, अन्नाचा भरपूर साठा असल्यास अल्प शिबंदीच्या सहाय्याने तो सर्व जगाविरुद्ध लढू शकेल. पाण्यासाठी मोठे तलाव असून पावसाळ्यात ते भरल्यावर पाणी वर्षभर पुरून उरेल.'

राज्यकारभारात गडांचे स्थान काय याबाबत आज्ञापत्र म्हणते,'ज्यास राज्य पाहिजे त्यासी गडकोट हेच राज्य! गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्य लक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वस्ती स्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार' त्यामुळे असा अभेद्य गड आपली राजधानी म्हणून महाराजांनी निवडला यात नवल ते काय?



संरक्षणदृष्ट्या रायगड जसा अभेद्य होता तसाच प्राचीन काळापासून व्यापारी दृष्टीनेही तो मोक?याच्या जागी होता. रायगडापासून जेमतेम २५ किलोमीटरवर महाड हे बाणकोट खाडीच्या तोंडावर वसलेले बंदर आहे. महाड बंदरात ठिकठिकाणाहून माल येत असे व महाड वरून बाहेर जात असे. हा व्यापार बाणकोट खाडीमार्गे चाले. रायगडाच्या पायथ्याशी कावळ्या घाट व कुंभे घाट असे दोन मार्ग जातात. त्यामुळे रायगडाच्या पायथ्या जवळून लमाणांची वाहतूक सतत चालू असे. या लमाणांसाठी दोन्ही घाटाच्या पायथ्याशी छत्री निजामपूर येथे अन्नछत्र असे. मालवाहतूक करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून राज्यकर्ते जकात वसूल करत.

महाराजांनी १६६७ पासून रायगडावर मुक्काम व राज्यकारभार सुरू केला. १६७० पासून रायगडावर राजधानीस आवश्यक अशा इमारती बांधण्यात याव्यात, अशी आज्ञा महाराजांनी कल्याणचे सुभेदार आबाजी सोनदेव यांना केली. त्याप्रमाणे १६७० पासून गडावर इमारती, पाण्यासाठी तलाव वगैरे बांधकामास सुरुवात झाली. गडावर कोणकोणती नवीन बांधकामे केली याची यादीच हिरोजी इंदुलकर यांनी जगदीश्वर मंदिरावरील शिलालेखात दिली आहे.

राजधानी व लष्करी ठाणे म्हणून जी बांधकामे महाराजांनी रायगडावर करून घेतली. त्याचा विचार करता असं लक्षात येतं की, गडावर त्यांनी एक अत्यंत सुनियोजित असे शहरच वसविले. भवानी टोकापासून ते हिरकणी बुरुजापर्यंत केलेल्या नगररचनेचा विचार करताना मती गुंग होते. संपूर्ण भारतात मराठाकालीन नगर रचनेचे एकमेव उदाहरण म्हणजे रायगड! गडावर महाराजांनी एकूण तीनशे इमारती बांधल्या अथवा गरजेप्रमाणे दुरुस्त केल्या. महाराजांच्या नंतर गडावर नवीन बांधकामे झालेली नाहीत. जी काही कामे झाली ती दुरुस्तीची! रायगडावरील 'नगर-रचना' म्हणजे महाराजांच्या प्रगल्भ प्रतिभेचा आविष्कार होय.

रायगडाच्या संरक्षणासाठी महाडला बाणकोट खाडीच्या तोंडाशी किल्ला आहे. महाहट म्हणजे मोठा बाजार शब्दावरून या गावाला महाड नाव पडले असावे. महाडमध्ये सहा ऐतिहासिक वाडे अजूनही चांगल्या स्थितीत दिसतात. पूर्वी कदाचित आणखीही असतील. महाडला कोटसुद्धा होता. पावसाळ्यात महाडमध्ये दरवर्षी पुराचे पाणी शिरते पण, खाडीच्या तोंडाशी असूनही पुराचे पाणी शिरणार नाही अशी नेमकी जागा शोधून हे वाडे बांधले आहेत. शत्रूच्या आरमाराकडून रायगडावर एकदम होणाऱ्या आक्रमणाला पायबंद घालण्यासाठी महाड हे महत्त्वाचे ठिकाण होते. बाणकोट खाडीमार्गे येणाऱ्या मालाची चढ-उतार करण्यासाठीही ते सोयीचे होते. महाडला चांभारगड म्हणून एक डोंगरी किल्ला आहे. मात्र तो फार लहान आहे. शिवाय वरती वस्तीची काहीच सोय नाही. त्यामुळे त्याचा उपयोग त्याकाळी केवळ टेहळणीसाठीच होत असावा. पाचाड ही रायगडाची माची! पाचाडला शिबंदी पण असे. पाचाडच्या कोटाचे अवशेष अजून स्पष्ट दिसतात. जिजाऊ मांसाहेबांना गडाची हवा मानवत नसे म्हणून, महाराजांनी पाचाडला कोट बांधला, असा उल्लेख काही पुस्तकांत आहे. या कोटाच्या आतील बांधकामे शिल्लक नाहीत पण, तटबंदी मात्र आहे. येथेच मातोश्री जिजाऊ साहेबांची समाधी आहे. रायगडवाडीलाही कोट बांधलेला होता. पाचाडप्रमाणे येथेही तटबंदी वगैरे काही शिल्लक नाही पण, बुरुजाचे व तटबंदीचे अवशेष दिसतात. रायगड वाडी हे गाव माणगाव व कावळ्या घाटाकडून येणाऱ्या मार्गावर आहे. गडावर लागणाऱ्या सामानाच्या पुरवठ्यासाठी हे ठिकाण महत्त्वाचे आहे. रायगडाच्या मागील बाजूस लिंगाणा किल्ला आहे. रायगडाच्या पूर्वेकडील संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी हे ठिकाण चांगले आहे.

बिरवाडीला सध्या जरी कोटाचे अवशेष दिसत नसले तरी नदीच्या काठी कोट होता असे म्हणतात. बिरवाडी पासून पुढे गेले म्हणजे वरंधा घाटाच्या तोंडाशी कावळ्या किल्ला आहेच. जंजिऱ्याच्या सिद्धी पासून स्वराज्याला कायमचाच धोका होता. त्याचे आक्रमण बाणकोट खाडीमार्गे होण्याची शक्यता जास्त होती. त्यामुळे खाडीच्या तोंडाशी व गडाकडे येणाऱ्या प्रत्येक मार्गावर संपूर्ण बंदोबस्ताची तसेच गडाला लागणाऱ्या मालाच्या पुरवठ्याची ही व्यवस्था केलेली होती. थोडक्यात म्हणजे रायगडाच्या परिसरात गडाच्या संरक्षणाची व्यवस्था चोख होती.

# आरटीओ'च्या आशिर्वादाने भंगारात निघालेल्या बसेसद्वारे धोकादायक वाहतूक सुरु : तिकीटांचे आव्वा की सव्वा दर : दिवाळी कॅश

**मोहन धारासूरकर**

**परभणी/प्रतिनिधी-** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर म्हणजे दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये काही खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी तिकीटांच्या दरात आव्वा की सव्वा वाढ करीत प्रवाशांची बेसुमार लूट सुरु केलीच परंतु, परजिल्ह्यातून, परप्रांतातून भंगारात निघालेल्या बसेस या जिल्ह्यात प्रवाशांच्या सेवेत तैनात करीत धोकादायक वाहतूक सुरु ठेवली आहे.

प्रत्येक उन्हाळी सुट्ट्या असो, किंवा दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये खाजगी ट्रॅव्हल्स धारकांकडून तिकीटाच्या दरात आव्वा की सव्वा रक्कमेची वाढ केली जात आली आहे. त्याद्वारे, प्रवाशांची बेसुमार लूट खूलेआमपणे होत आली



आहे. यावर्षीसुध्दा दिवाळीच्या सुट्ट्या जाहीर झाल्याबरोबर खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी ऑक्टोंबरचा महिना पूर्णतः कॅश करण्याकरीता चढाओढीने तिकीटांच्या दरात मोठी वाढ केली.

विशेषतः महानगरांकडून जिल्ह्यात सणा सुदीनिमित्त येणाऱ्या भूमीपुत्रांना या तिकिट दरातील वाढीचा मोठा तडाखा बसला. पुणे ते परभणी प्रत्येक प्रवाशामागे किमान १४०० ते २८०० रुपये हे सर्वसाधारणपणे तिकीटाचे दर आकारले जात होते. पुणे पाठोपाठ मुंबईचेही तिकीटांचे दर हे २२०० ते ३२०० रुपये आकारले जात होते. शनिवार व रविवार तर हे दर आणखीनच भडकत आहेत. खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी दररोजच हे दर टप्प्या टप्प्याने वाढविण्याचे धोरण अवलंबविले आहे. शनिवार व रविवार या दोन दिवसात तर पुणे असो, मुंबई, कोल्हापुर, नागपुर असो किंवा सुरतकडे जाणाऱ्या बसेसच्या दरामध्ये प्रचंड वाढ केली जात आहे.

भंगार बसेसद्वारे धोकादायक प्रवाशी वाहतूक

संपूर्ण दिवाळी सुट्ट्यांचे सीझन कॅश करण्याकरीता ट्रॅव्हल्सधारकांनी भंगारात निघालेल्या बसेससुध्दा रस्त्यावर आणून धावण्याचे धोकादायक प्रकार अवलंबविले आहेत. परभणी शहरातून स्थानिक पातळीवरुन सर्वसाधारणपणे पुणे व मुंबई करीता ४० बसेस धावत आहेत. प्रवाशांची गर्दी ओळखून या कंपन्यांनी पर जिल्ह्यातून, परप्रांतातून मोडकळीस निघालेल्या बसेस रस्त्यावर आणून धोकादायक पध्दतीने सुरु केल्या आहेत. त्यामुळे या भंगारात निघालेल्या बसेसमधून मजूरी निमित्त आलेल्या प्रवाशांना अक्षरशः कोंबल्या जात आहे.

परप्रांतीय पासींगच्या खाजगी गाड्यांचा सुळसुळाट...

अरुणाचल प्रदेश (एआरएनएल) व मध्यप्रदेश येथून पासींग करुन आलेल्या दोन बाय दोनच्या खाजगी ट्रॅव्हल्स परभणी जिल्ह्यात धावू लागल्या आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या ट्रॅव्हल्स सक्षम नसतांनाही प्रादेशिक परिवहन कार्यालयातील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या साटेलोट्यातून, आशिर्वादातून हे प्रकार सर्रास सुरु आहेत. अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश पासींगच्या जवळपास ३० ते ३५ बसेस परभणी जिल्ह्यात धावत असून त्यातून मोठी उलाढाल खूलेआमपणे सुरु आहे. महाराष्ट्रात दोन बाय दोन खाजगी ट्रॅव्हल्सला बंदी आहे. त्यामुळे अशा गाड्यांची महाराष्ट्रात पासींग होत नाही, त्यामुळे परप्रांतातून अशा गाड्यांची पासींग करुन घेतली जात आहे व त्या गाड्या परभणी जिल्ह्यातून धावत आहेत.

हंगाम कॅश करण्याचा एकच चंग...

दिवाळी सुट्ट्या पूर्णतः कॅश करण्याचा संकल्प खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी सोडला असून नियमित बसेस सोडणाऱ्या कंपन्यांनी आता आपल्या ताफ्यात प्रवाशांची गर्दी ओळखून मोडकळीस निघालेल्या बसेससुध्दा दाखल करीत त्यांच्याद्वारे प्रवाशांची लूट सुरु केली आहे. या बसेसमधून कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. विशेषतः निकृष्ट दर्जाची आसनव्यवस्था, मोडकळीस निघालेल्या खिडक्या तसेच हालणारे डुलणारे आसन, मळकट, कळकट गाद्या व त्यांचे कव्हर असे वाईट अनुभव प्रवाशी मूकपणे सहन करत आहेत. परंतु, त्याचे सोयरसुतक सरकारी यंत्रणेस नाही, हे दुर्दैव आहे. प्रवाशीसुध्दा कुठेही तक्रार न करता निमूटपणे पैसे मोजून कसबसा पल्ला गाठण्याचा धोकादायक प्रयत्न करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### रन फॉर युनिटीला गंगाखेडकरांचा प्रतिसाद




**गंगाखेड,/प्रतिनिधी :** लोहपुरुष स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या.जयंती निमित्त पोलिस दल व गंगाखेड पोलीस ठाण्याच्या वतीने (दिनांक ३० ऑक्टोबर गुरुवार) रोजी सकाळी ६ वा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर रन फॉर युनिटी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम गंगाखेड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.यावेळी उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर,उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र शिरतोडे,तहसीलदार उषाकिरण श्रंगारे आदींची उपस्थिती होती.

रन फॉर युनिटी कार्यक्रमास शहरातील सर्वयोग कक्षेचे योग शिक्षक,साधक, रॉयल अँकॅडमीचे संचालक प्रशिक्षणार्थी विद्यार्थी पोलिस ठाण्याचे कर्मचारी,लायन्स क्लबचे पदाधिकारी,सामाजिक संस्थांचे सदस्य, शहरातील सुजाण नागरिक आदींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अधिकारी कर्मचारी व सर्व नागरिकांनी सकाळी तीन किलोमीटर धावून सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी केली याप्रसंगी जीवराज डापकर,श्रीकांत डोंगरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचा उद्देश सांगितला या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पदूदेव जोशी यांनी केले तर आभार योगगुरू प्रकाश डिकळे यांनी मानले या कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् ने करण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले.

### बेलदार समाज संघ तालुकाध्यक्षपदी शेख जियाउलहक्क यांची निवड



**गंगाखेड,/प्रतिनिधी :** शहरातील बेलदार समाजाचे युवा नेते शेख जियाउलहक्क यांची बेलदार समाज संघाच्या गंगाखेड तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. परभणी येथे बेलदार समाज संघाची बैठक संस्थापक अध्यक्ष खलील बेलदार यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली सदरील बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या यामध्ये गंगाखेड तालुकाध्यक्षपदी बेलदार समाजाचे जेष्ठ युवा नेते शेख जियाउलहक्क यांची गंगाखेड तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.परभणी जिल्हाध्यक्ष मगदूम बेलदार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते सय्यद जमीर,खलील बेलदार,शेख सद्दाम,चांद बेलदार,अफजल बेलदार,अन्वर बेलदार,मोबीन बेलदार, खदिर बेलदार,वसीम बेलदार आदींसह गंगाखेड बेलदार समाज संघाच्या वतीने शेख जियाउलहक्क यांव्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

### तीन महसुल विभागांना रब्बीसाठी विशेष मदत पॅकेजमधून निधी वर्ग

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील बहुतांशी जिल्ह्यामध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी व पुरामुळे आपत्ती उद्भवली. त्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीपीक नुकसान, शेतजमीन खरडून जाण्यासह विरीहींचे नुकसान, मनुष्य व पशू हानी, घरांची पडझड, घरातील वस्तू साहित्याचे नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वत्रिक मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती प्राधीकरणाच्या नियमानुसार या आपदग्रस्त शेतकऱ्यांना रब्बी हंगामामध्ये बियाणे व इतर बाबींकरीता राज्य सरकारने विशेष मदत पॅकेज जाहीर करत प्रतिहेक्टरी दहा हजार रुपये अतिरिक्त मदत व अर्थसहाय्य संदर्भातील निर्णय १० ऑक्टोंबर रोजी जाहीर केला होता. त्याअनुषंगाने पुणे, नाशिक व अमरावती महसूल मंडळांतर्गत विभागीय आयुक्तांनी अतिरिक्त मदतीबाबतचे प्रस्ताव सादर केल्यानंतर महसूल व वन विभागाने या तीनही महसूल मंडळांना १७६५ कोटी २२ लाख ५५ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास गुरुवारी मंजूरी बहाल केली. त्याप्रमाणे पुणे महसुल मंडळांतर्गत सातारा, नाशिक मंडळांतर्गत नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहिल्यानगर, तसेच अमरावती मंडळांतर्गत अमरावतीसाठी हा निधी वर्गसुध्दा करण्यात आला आहे.

दरम्यान, मराठवाड्यातील बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे येत्या रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुवांशिक बाबींकरीता विशेष मदतीच्या निर्णयाच्या अंमलबजावनी बाबत लक्ष लागले आहे. रब्बी हंगामा व्यतिरिक्त या शेतकऱ्यांना अद्यापही दिवाळीत वर्ग झालेले अनुदानाच्या रक्कमा खात्यात जमा झाले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा भाजपा मध्ये जाहीर पक्षप्रवेश



### चिंचोली दराडे येथील राष्ट्रवादीचे उपसरपंच गुलाबराव दराडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**जिंतूर,/प्रतिनिधी** तालुक्यातील चिंचोली दराडे येथील राष्ट्रवादीचे उपसरपंच गुलाबराव दराडे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी जिंतूर येथील माजी आमदार रामप्रसाद जी बोर्डीकर यांच्या निवासस्थानी नयन स्वप्न निवासस्थानी छोटे खाणी एका कार्यक्रमात माजी आमदार परभणी जिल्ह्याचे भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे भाजप चे जिल्हा सचिव डॉक्टर पंडितराव दराडे चिंचोली दराडे येथील माजी पंचायत समिती सदस्य प्रभाकर रावजी दराडे माजी सरपंच माधवराव दराडे माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानरावजी वाटाणेअजित भोबेपाटील यांच्या उपस्थितीमध्ये चिंचोली दराडे येथील असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिट्ठी देऊन भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना उपसरपंच म्हणालेकी आगामी काळात येणाऱ्या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत या निवडणुकीमध्ये आम्ही ताकतीने भाजपच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार व देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहणार असा विश्वास व्यक्त केला भाजपमध्ये पक्षप्रवास करणारे चिंचोली दराडे येथील उपसरपंच गुलाबराव दराडे संतोषराव चिलगर चांमनी पांडुरंग दराडे उपसरपंच संतोष दराडे अशोकराव दराडे कैलास निवृत्ती दराडे मधुकर दराडे काशिनाथ दराडे साहेबराव दराडे ज्ञानोबा मुंडे ज्ञानदेव दराडे जगन्नाथ दराडे बालासाहेब दराडे गजानन कुटे गजानन दराडे विष्णू दराडे शिवशंकर दराडे महादू दराडे नाजुकराव पाटील यांच्यासह राष्ट्रवादीच्या असंख्य कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला आहे यावेळी पक्षांमध्ये प्रवेश करणाऱ्यांचे परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर गोविंद भाऊथिटे पंडितराव दराडे भाजप युवा मोर्चा चे जिंतूर तालुका अध्यक्ष माधवराव दराडे प्रभाकर दराडे माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानरावजी वटाणेयांनी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले आहे

## सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त पोलीस दलाच्यावतीने रन फॉर युनिटी दौडला उस्फूर्त प्रतिसाद

### युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हेच उद्दिष्ट

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सरदार १५० एकता अभियान अंतर्गत या अभियानात रन फॉर युनिटी दौडचे आयोजन पूर्णा पोलीस ठाण्याच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून, शहराच्या मुख्य रस्ता, छत्रपती संभाजी महाराज चौक, गुड मॉर्निंग रोड, राजमुद्रा चौक पासून टी पॉइंट पर्यंत करण्यात आले होते. या उपक्रमात उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. समाधान पाटील, पोलीस निरीक्षक विलास गोबाडे, नायब तहसीलदार प्रशांत थारकर, क्रीडा मार्गदर्शक महेश जाधव, सज्जन जयस्वाल,विशाल चितलांगे, मुन्ना राठोड, ज्ञानोबा काटकर, विष्णू यादव, बळीराम काळबांडे आदीच्या प्रमुख उपस्थितीत रन फॉर युनिटी दौड चे शुभारंभ करण्यात




आला.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या अभियानांतर्गत भारत सरकारच्या माय भारतच्या नेतृत्वाखाली सरदार१५० युनिटी मार्च या देशव्यापी उपक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. याचे उद्दिष्ट देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून एक भारत, आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास शहरातील टी पॉइंट पर्यंत करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून एक भारत, आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहित केले जाईल. या उपक्रमाद्वारे युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे, तसेच विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत युवा पिढीला सक्रिय योगदान देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या उपक्रम यशस्वीसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमन

### श्रीमती मीरा कोटीखाने यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील वसमत रस्त्यावरील विवेक नगरातील ज्येष्ठ नागरिक मीरा रमेश कोटीखाने यांचे शनिवारी सकाळी ११.३० वाजता परभणीतील एका खाजगी रुग्णालयात वृध्दापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७५ वर्षांच्या होत्या. त्याच्या पश्चात मुलगा ॲड. रोहित कोटीखाने, विवाहित कन्या, नातू असा परिवार आहे. दरम्यान, श्रीमती कोटीखाने यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कपडे धुतांना दोन बहिणी बुडाल्या

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तलावात कपडे धुण्यासाठी गेल्या असता दोन सख्या बहिणी बुडाल्या. यात एकीचा मृत्यू झाला तर दुसऱ्या बहिणीची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना जिंतूर तालुक्यातील कुन्हाडी शिवारात गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी दुपारी घडली.

**जिंतूर तालुक्यातील कुन्हाडी येथील घटना, दुसऱ्या बहिणीची प्रकृती गंभीर**

सातपुर नाशिक येथे वास्तव्यास असलेले परमेश्वर बारकीराम चव्हाण हे कुटुंबासह नातेवाईकाच्या लग्नासाठी कुन्हाडी येथे आले होते. गुरुवारी दुपारी त्यांची मुलगी पूजा परमेश्वर चव्हाण वय २० वर्ष, दुसरी मुलगी संध्या परमेश्वर चव्हाण वय १७ या दोघी कपडे धुण्यासाठी गावाशेजारील तळ्यावर गेल्या होत्या. यावेळी दोघींचा पाय घसरून दोघी तळ्यात पडल्या. या ठिकाणी असलेल्या महिलांनी आरडाओरड केली. गावातील नागरीक धावून आले. त्यांनी सदर बहिणींना तळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला. थोड्या वेळात पूजा सापडली तिला ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. अर्ध्या तासाच्या शोध मोहिमेनंतर संध्या देखील मिळून आली. ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. पारवे यांनी तिला तपासून मयत घोषीत केले. यावेळी रुग्णालय परिसरात नातेवाईकांनी गर्दी केली होती.

## राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांचा पाठपुरावा यशस्वी; परभणी विभागासाठी नवीन सी-बँड रडार मंजूर

**परभणी,/प्रतिनिधी-** केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी पत्राद्वारे मिशन मौसम' योजनेअंतर्गत परभणी विभागात नवीन सी-बँड रडार बसविण्याचा प्रस्तावही केंद्र सरकारने मंजूर केला असल्याचे कळविले आहे.

अत्याधुनिकडॉपलरवेदररडार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण व पाणी पुरवठा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर मराठवाड्यात हवामान अंदाजासाठी अत्याधुनिक डॉपलर वेदर रडार () बसविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'मिशन मौसम' योजनेअंतर्गत परभणी भागात आणखी एक नवीन सी-बँड रडार डॉ. जितेंद्रसिंह यांनी पाठविलेल्या पत्रात पुढे नमूद केले आहे की , सोलापूर येथे आधीपासून कार्यरत असलेला २५० कि.मी. परिघाचा डॉपलर रडार सध्या परभणी आणि नांदेड परिसरातील हवामान निरीक्षणासाठी वापरला जात आहे. तसेच 'मिशन मौसम' योजनेअंतर्गत परभणी भागात आणखी एक नवीन सी-बँड रडार बसविण्याचा प्रस्तावही केंद्र सरकारने मंजूर केला आहे. शेतकऱ्यांना वेळेवर हवामानाची अचूक माहिती मिळणार राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले की,मराठवाडा हा दुष्काळप्रवण प्रदेश असून शेतकऱ्यांना वेळेवर हवामानाची अचूक माहिती मिळावी यासाठी हा उपक्रम अत्यंत आवश्यक होता. केंद्र सरकारकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आता हवामान अंदाजासाठी आपली क्षमता अधिक बळकट होईल. म्हैसमळ टेकडी, छत्रपती संभाजीनगर येथे सी-बँड प्रकारचा २५० कि.मी. परिघाचा रडार राज्यमंत्री साकोरे बोर्डीकर यांनी केंद्र सरकारकडे परभणी येथे हवामान निरीक्षणासाठी डॉपलर रडार बसविण्याची मागणी केली होती. त्यासंदर्भात केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी कळविले आहे की , म्हैसमळ टेकडी, छत्रपती संभाजीनगर येथे सी-बँड प्रकारचा २५० कि.मी. परिघाचा रडार बसविण्याचे काम सुरू आहे. या केंद्रामुळे मराठवाडा विभागातील हवामान निरीक्षण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केंद्र सरकारचे मानले अभार या निर्णयामुळे मराठवाड्यातील शेती, पिक संरक्षण, हवामान पूर्वसूचना व आपत्ती व्यवस्थापनाला मोठा हातभार लागणार असल्याने राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केंद्र सरकारचे अभार मानले आहे.



# पाणी उपलब्धतेसाठी जलतारा जनचळवळ : जिल्हाधिकारी कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ नोव्हेंबर-**

सतत बदलणारे हवामान, अनियमित पावसाचे चक्र आणि बदललेली भौगोलिक परिस्थिती यामुळे शेतीला गंभीर फटका बसत असताना नांदेड जिल्हा प्रशासनाने पाणी संवर्धनाचा भक्कम निर्धार केला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शेतासाठी पाणी उपलब्ध व्हावे, पावसाचे पाणी शेतातच मुरावे यासाठी जलतारा जनचळवळ राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठक व कार्यशाळेत सर्व अधिकाऱ्यांना दिली.



याबाबत नियोजन भवन येथे ३१ ऑक्टोबर रोजी कार्यशाळाही संपन्न झाली. या कार्यशाळेत उपजिल्हाधिकारी (रोहयो) महेश वडदकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी जलताराचे फायदे, निधी व तांत्रिक तपशील याचे सादरीकरण केले. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मनरेगा अधिकारी-अभियंते उपस्थित होते.

**पावसाचे पाणी शेतात -जलतारा म्हणजे काय ?**

शेतातील उताराच्या स्थळी ५ फूट लांबी, ५ फुट रंदी, ६ फुट खोलीचा खड्डा करून, त्यात दगडांनी भर घालून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची ही सोपी, वैज्ञानिक पद्धत आहे. यामुळे पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरते, भूजल पातळी वाढते, शिवारातील विहिरी-बोअरवेलना पाणी मिळते, पिकांच्या वाढीस मदत होते, शेताची जागा वाया जात नाही. एक जलतारा पावसाळ्यात सुमारे ३.६० लाख लीटर पाणी जमिनीत मुरवतो.

**मोठा संकल्प १ लाख जलतारे**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत व कृषी विभागाच्या समन्वयातून एक लाख जलतारे तयार करण्यात येणार असून हे काम मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यातून साधारण ३६०० कोटी लीटर पाणी संरक्षित होणार आहे.

मनरेगा मार्फत आर्थिक सहाय्य

जलतारा तयार करण्यासाठी मनरेगा योजनेतून अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्रति एकर ६ हजार रुपयापर्यंत लाभ मिळणार आहे. यामुळे पाणी उपलब्धतेबरोबरच ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसही चालना मिळेल. ग्रामीण भागात रोजगार व मनरेगाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या अभियानाबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांनी तालुकास्तरावर कार्यशाळा घेऊन तातडीने कामे मंजूर करून मार्चअखेर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

# किनवट पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यांची नोंद

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १ नोव्हेंबर-**

किनवट पोलीस ठाण्यात मागील काही दिवसांत तीन वेगवेगळ्या घटनांवरून गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

आत्महत्येची घटना (आ.म्र. नं. ३९/२०२५ कलम १९४ इछडड) मांडवा (ता. किनवट) येथे दि. २३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास व्यंकट नारायण बोल्लेवार (वय ४७) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेची खबर त्यांचे चुलत भाऊ प्रभाकर रामलु बोल्लेवार (वय ३४) यांनी दिली. या प्रकरणी नोंद करून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल मुंडे यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

मारहाण व धमकीप्रकरणी गुन्हा (गुरन क्र. २९८/२०२५ कलम ११८(१), २९६, ३५१(२), ११५(२), ३(५) इछड) फिर्यादी सरिता रवी चव्हाण (वय ३०, रा. सिंदगी (ची), ता. किनवट) यांनी आपल्या पती व सासऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. दि. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारास सिंदगी येथे दोघांनी मिळून फिर्यादीस शिवीगाळ, मारहाण करून गंभीर दुखापत केली तसेच पुन्हा आमच्या घरी आलीस तर जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ वाघमारे यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

धार्मिक भावना भडकविणारा व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी गुन्हा (गुरन क्र. २९९/२०२५ कलम ३५३, २९९ इछड) रविकांत किशन कंतूलवार (वय ३६, रा. बोधडी बु.) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेख सोहेल (रा. एकता नगर, गोकुंदा) याने mr sohel king ४२० या इंस्टाग्राम आयडीवर गोमातेचा व गोमासाचा आक्षेपार्ह व्हिडिओ स्टेटस म्हणून प्रसारित केला. या कृत्यामुळे हिंदू बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या व समाजात द्वेष निर्माण झाला. या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास पोलीस उप निरीक्षक फडेवार यांच्या कडे दिला आहे. सर्व गुन्ह्यांचा तपास पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## जांब गटातून जयपाल गायकवाड यांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जांब** -जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून जांब गटात जयपाल गायकवाड यांचे नाव जोरदार चर्चेत आले आहे. गायकवाड यांनी अलीकडेच हिप्परगा, दापका राजा आणि लादगा येथे घेतलेल्या संवाद दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे स्वागत करत काँग्रेसला पाठिंबा दर्शविला. जांब गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून, या वेळी स्थानिक उमेदवाराचा मुद्दा ठळक झाला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी स्थानिक पातळीवरून उमेदवारीसाठी नावे मागवली होती, त्यात उच्चशिक्षित आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत जयपाल गायकवाड यांचे नाव पुढे आले आहे. गायकवाड यांच्या संपर्क दौऱ्यांना वाढता प्रतिसाद मिळत असून, स्थानिक युवा चेहरा आणि प्रामाणिक प्रतिमा या बळावर काँग्रेसला जांब गटात गती मिळाल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भाजप व इतर पक्षांचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे गायकवाड यांच्या प्रचाराला जांब गटात सुरुवातीपासूनच वेग आला आहे.

# नांदेड भाजपा ओबीसी मोर्चाचा जिल्हा उपाध्यक्षपदी गणेश काकडे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १ नोव्हेंबर-**

भाजपा नांदेड ओबीसी मोर्चाचा जिल्हा उपाध्यक्षपदी सक्रीय,सामाजिक कार्यकर्ते गणेश काकडे यांची अमर राजूरकर यांच्या उपस्पथित एका नियुक्ती पत्राव्दारे करण्यात आली आहे.

नांदेड वाघाळा शहर प्रभाग क्रमांक १९ जुना कौठा येथील भाजपाचे सक्रीय तथा सामाजिक कार्यकर्ते गणेश धोडींबाराव काकडे यांच्यी नियुक्ती माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण , खासदार अजित गोपछेडे व संघटक मंत्री संजय कौडगे,भाजपा महानगर जिल्हा अध्यक्ष अमर राजूरकर यांच्या आदेशानुसार



गणेश काकडे नियुक्ती करण्यात आली यावेळी महानगर अध्यक्ष अमर राजुरकर, शितल खांडील, माजी नगरसेविका ललिता शिंदे उपस्थिती होती.सदरील नियुक्ती बदल सामाजिक, राजकीय, मित्र मंडळी यांच्या कडुन अभिनंदन होत आहे.

# गजानन सुर्यवंशी यांच्या कार्यालयास भाजपा पदाधिकाऱ्यांची भेट

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पक्षाचे शहर मंडळ अध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांच्या कार्यालयात महामंत्री संजय भाऊ कोडगे , दक्षिण जिल्हा अध्यक्ष संतुकराव हांबर्डे यांनी पक्ष कार्यालयात भेट दिली असता त्यांचा यथोचित सत्कार करुन अगामी नगर परिषद निवडणूकीची रननिती कशी असावी विरोधकाला हाद्पार कशा झाला पाहिजे अशी आखणी करावी येणाऱ्या काळात नगर परिषदेमध्ये भाजप पक्षाच्या ताब्यात असली पाहिजे अशी राजकारणातील टिप्स दिल्या आहे.



लोहा तालुक्यात भाजप पक्षाची व्याप्ती मोठी आहे सर्वात मोठा पक्ष आहे . शहरासह तालुक्यात पक्षाचे मतदार व जनतेत ध्येय धोरणा विषय जनतेत जन जागरण करुन मतदार आपल्याकडे वळला पाहिजे. भारतीय जनता पक्षाचे पक्ष निरीक्षक एकनाथ दादा पवार यांनी मतदारसंघ झंझावात दौरे करुन गाव वाडी तांडे पिंजुन काढत आहे यांच्या जनतेतील जन संपर्काचा हामखास फायदा होईल. नगर परिषद निवडणूक अगदी जवळ आली आहे आगामी काळात सत्ता आपलीच राहिली पाहिजे यासाठी रननीती कशी असावी विरोधकांची कोंडी कशी करावी अशा अनेक राजकीय टिप्स दिल्या यावेळी संजयभाऊ कोडगे,संतुकराव हंबर्ड,लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी, तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष शरद पाटील पवार, दिनेश भाऊ मोटे, माजी नगरसेवक संदिप दमकोंडावार, युवराज वाघमारे संजय चव्हाण, यशपाल निर्मले, लक्की फुलवरे, शाहरुख शेख,पिंनू चुडावकर, वैभव हाक्के, बाळासाहेब कतुरे आदी उपस्थित होते.

# अबकी बार स्थानिक उमेदवार, हर एक मतदार की पुकार !

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. १ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे कोणत्याही क्षणी निवडणूक आयोग आचारसंहिता लावण्याची शक्यता आहे १३ आक्टोंबर रोजी जिल्हा परिषद पंचायत समीती सदस्यांसाठी आरक्षणाची सोडत झाली आहे हाणेगाव जिल्हा परिषद गट सर्वसाधारण पुरुष सुटल्याने स्थानिक व बाहेरील इच्छुक उमेदवारांच्या भेटीगाठी वाढल्याचे दिसते आहे पण हाणेगाव गटात स्थानिक उमेदवारालाच प्रथम पसंती मिळण्याचे संकेत आहे पक्ष कोणताही असो स्थानिक उमेदवाराचा प्रथम विचार करायला हवा असे मतदार व कार्यकर्त्यांत चर्चा आहे. बाहेरील उमेदवार एकदा निवडुन गेला की पाच वर्ष भेटत नाही मग आमचे समस्या आमचे म्हणणे कोणास सांगावे अशी चर्चा मतदारांत ऐकावयास मिळते आहे.




कोणताही पक्ष स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोडुन पैशाच्या जोरावर बाहेरच्या उमेदवाराला पसंती दिल्यास स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अण्याय होईल याचा देखील पक्षाने विचार करायला हवा,असे मतदारांत चर्चा आहे सध्यातरी भाजप कडुन स्थानिक प्रबळ उमेदवार म्हणून भाजपाचे तालुका अध्यक्ष प्रितम बाळासाहेब देशमुख यांचा नाव पुढे येत आहे तर काँग्रेस पक्षाकडुन स्थानिक उमेदवारात शिवाजी शिंदे पाटील यांचे नाव पुढे येत आहे व उबाठा गटाकडुन स्थानिक उमेदवार तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे यांच नाव पुढे येत आहे आणि वेगवेगळ्या पक्षाकडुन पंचायत समीती हाणेगाव ओपन महीला व वझर पंचायत समीती ओबीसी पुरूष उमेदवारासाठी स्थानिक उमेदवाराचे शोध चालु असल्याचे मतदार व सुशिक्षीत नागरीकांत चर्चा आहे एकंदरीत पाहता जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी पक्ष कोणताही असो पण स्थानिक उमेदवारावरच विजयाचे गुलाल उधळेल असे स्थानिक मतदारांत चर्चा ऐकावयास मिळते आहे.

## इच्छुक उमेदवार अंकुश भालेराव यांच्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा पूर्ण!

**किनवट** -गोकुंदा पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले अंकुश भालेराव यांनी आपल्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण केला आहे. गणातील विविध गावांना भेट देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या गावांमध्ये झाला दौरा: पहिल्या टप्प्यात अंकुश भालेराव यांनी गणातील महत्त्वाची गावे असलेल्या गोकुंदा, कोठारी, शनिवारपेठ, प्रधानसांगवी, बेंदी, बेदी तांडा, आणि आमडी या गावांना भेटी दिल्या. उद्देश आणि प्रतिसाद: या दौऱ्यात त्यांनी नागरिकांच्या समस्या, मूलभूत गरजा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. या भागातील नागरिकांनी श्री. अंकुश भालेराव यांचे उत्साहाने स्वागत केले आणि त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. पुढील टप्प्याची तयारी: पहिल्या टप्प्याला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर, आता अंकुश भालेराव लवकरच दौऱ्याचा पुढील टप्पा सुरू करणार असल्याचे त्यांच्या कडून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगण्यात आले. उर्वरित गावांमध्ये भेट देऊन ते आपला जनसंपर्क वाढवणार आहेत. अंकुश भालेराव यांच्या या सक्रिय जनसंपर्क अभियानामुळे गोकुंदा पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.



# देशाच्या सुरक्षेसाठी योगदान देत राहिले पाहिजे : ख्वाजा सज्जनुद्दीन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ नोव्हेंबर-**

सीटीसी सीआरपीएफ मुदखेडच्या परिसरात दि.३१ ऑक्टोबर रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री, स्वातंत्र्यसेनानी आणि देशवासीयांचे लाडके, ज्यांना भारताचे बिस्मार्क ही पदवी देऊन गौरवण्यात आले आणि देशाला एकजूट करणारे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती सीआरपीएफने मोठ्या उत्साहात साजरी केली.

विविध कार्यक्रमांच्या आयोजनाच्या मालिकेत, सकाळी सर्वप्रथम सीटीसी मुदखेडचे सैनिक आणि अधिकाऱ्यांनी रन फॉर युनिटी या धावण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते, जे मुदखेड शहरातून गेले आणि सीटीसी सीआरपीएफच्या परेड ग्राउंडवर संपले. नंतर, केंद्रीय विद्यालयाचे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी देखील या शर्यतीत सहभागी झाले. यावेळी पोलीस महानिरीक्षक प्राचार्य ख्वाजा सज्जनुद्दीन यांनी उपस्थित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकतेसाठी संवेदनशील राहण्याची आणि त्याप्रती नेहमीच वचनबद्धता दाखवण्याची जबाबदारी दिली.

आपल्या भाषणात, पोलिस महानिरीक्षक सज्जनुद्दीन यांनी या दिवसाचे महत्त्व आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशासाठी केलेल्या अनुकरणीय कार्याबद्दल आणि कामगिरीबद्दल सांगितले. ते म्हणाले की, विविध अडचणी असूनही, आपण सर्वांनी एकतेचे समर्थक असले पाहिजे आणि देशाच्या सुरक्षेसाठी आणि सुरक्षिततेसाठी आपले अपवादात्मक योगदान देत राहिले पाहिजे. हीच सरदार वल्लभभाई पटेल यांना खरी श्रद्धांजली असेल.

या प्रसंगी संस्थेचे मुख्य प्रशिक्षण अधिकारी आणि कमांडंट वेद प्रकाश त्रिपाठी, मोहम्मद शाहनेवाज उपकमांडंट, हरिशंकर प्रसाद सहाय्यक कमांडंट, उत्तम साखरे सहाय्यक कमांडंट (मंत्री), इतर अधीनस्थ अधिकारी, सैनिक, प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# कला सन्मान पुरस्काराने चित्रकार वर्मा सन्मानित; माहूरच्या कला संस्कृती क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १ नोव्हेंबर-**

स्व.हरिभाऊजी नागतुरे ग्राम विकास बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक संस्था वणी व आर्टिस्ट स्पेस नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चित्र,शिल्प स्पर्धा व प्रदर्शनात माहूर येथील अंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार रण्जीत दत्त वर्मा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. किरणताई संजय देरकर (अध्यक्षा, एकवीरा महिला बँक, मारेगाव) यांच्या हस्ते कला सन्मान या पुरस्काराने सन्मानित. आजपर्यंत विविध पुरस्कारांनी सन्मानित अस्सल कलेचे धनी, एक प्रतिभावंत गुणी कलाकार चित्रकार रणजित वर्मा यांचा माहूरच्या कला संस्कृती क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून,सर्वस्तरातून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

स्व.हरिभाऊजी नागतुरे ग्राम विकास बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक संस्था वणी व आर्टिस्ट स्पेस नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चित्र,शिल्प स्पर्धा व प्रदर्शन दि.२८ ते ३० ऑक्टोबर २०२५ या दरम्यान लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ येथे भरविण्यात आले होते. प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी आयोजित कार्यक्रमात माहूर येथील शिक्षक चित्रकार रणजीत दत्त वर्मा यांच्या जलरंगातून साकारलेल्या निसर्ग चित्रणास वणी येथील रसिकांनी भरभरून दाद दिली.वर्मा यांचे हे प्रात्यक्षिक वणी येथे दिलेले पहिले प्रात्यक्षिक होते,जे विशेष उल्लेखनिय असे ठरले.प्रात्यक्षिक सादर करताना वर्मा यांनी प्रश्नोत्तरातून विद्यार्थी व रसिकांशी संवाद साधत रसिकांवर आपल्या कलेची अक्षरशा: भुरळ घातली.



बक्षिस वितरण सोहळ्याच्या समारोपीय कार्यक्रमात चित्रकार रण्जीत दत्त वर्मा यांना कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. किरणताई संजय देरकर (अध्यक्षा, एकवीरा महिला बँक, मारेगाव) यांच्या हस्ते कला सन्मान या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे बक्षिस वितरणामध्ये शिल्प विभागासाठी चित्रकार रणजित वर्मा यांचे वडील दिवंगत पत्रकार तथा चित्रकार दत्त वर्मा यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रथम पारितोषिक देऊन कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजक प्रकाश नागतुरे अध्यक्ष तथा माजी गटशिक्षणाधिकारी तथा प्रदिप नागतूरे सचिव, प्राचार्य बा. ना. कला महाविद्यालय पुसद यांच्या संकल्पनेतून स्व हरिभाऊजी नागतुरे यांच्या स्मरणार्थ राज्य स्तरीय चित्र , शिल्प प्रदर्शनाच्या आयोजनाने वणी येथील रसिकांना मिळालेली मेजवाणी खरोखरच अविस्मरणीय अशी ठरली असल्याचे मनोगत सौ. किरणताई संजय देरकर यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले. वर्मा यांच्या या दुहेरी यशाबद्दल अशोक सोनटक्के, महादेवराव,

गजानन कासावार, हरिदास वनस्कर, विजय गंधेवार,गजानन गोडे, म .प्रा. शिक्षण परिषदेचे तालुकाध्यक्ष शेषराव पाटील,विक्रांत हटकर,महेश अण्णापुरे,गणेश कुरुडे,सारंग नागठाणे,प्रा.गजानन बोबडे, प्रा.चंद्रशेखर कुमावत, आकाश खोब्रागडे,

गणेश नैताम,स्वाती नैताम,अरविंद जाधव यांसह अनेकांनी अभिनंदन करत कला क्षेत्रातील पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.


लवाद प्राधिकरण
लवाद अधिकारी श्री. प्रतिक पी. कोठारी
(मल्टी-स्टेट को.ऑप.सोसायटीज अॅक्ट २००२ आणि आर्बिट्रेशन अँड कन्सिलिएशन अॅक्ट १९९६ अन्वये)

**जाहीर नोटीस** दि.: २७/१०/२०२५

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक),अहमदनगर
पो.बॉक्स नं.-७, बँक रोड, अहमदनगर - अर्जदार
विरुध्द - खालील सामनेवाले

| लवाद अर्ज क्र. व सामनेवाला यांचे नाव | दावा रक्कम |
|---|---|
| लवाद अर्ज क्र.१३/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>सचिन जगन्नाथ शहाणे, रा.न्यू बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | रु. ५,७४,५१६ |
| लवाद अर्ज क्र.१८/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>गंगाधर नाथराव मुंढे, रा. प्लॉट नं. ४३, ज्योतीनगर / दशमेशनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर | रु. १४,६४,८९६ |
| लवाद अर्ज क्र.१७/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>मंगेश नाथराव मुंढे, रा.दशमेशनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर | रु. ११,७०,४६१ |
| लवाद अर्ज क्र.१५/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>विजय सांडू साबळे, रा.मारुती मंदिरासमोर, एनबीजी १०, बालाजीनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर | रु. ०५,१९,४७९ |
| लवाद अर्ज क्र.१४/२०२५ व १६/२०२५<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा.७४, जुनेगाव पाचोड बु ll, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | १०,४१,२६९ व ५,७०,१४२ |
| लवाद अर्ज क्र. १३, १८, १७, १५ / २०२५<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा.७४, जुनेगाव पाचोड बु ll, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | वरील ०१ ते ०४ प्रमाणे |


ज्यापेक्षा अर्जदार यांनी तुमचे विरुध्द रक्कम वसुलीसाठी लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा तुम्ही स्वतः अथवा तुमचे माहितगार वकीला मार्फत दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता श्री. प्रतिक पी. कोठारी, लवाद अधिकारी, आर्बिट्रल ट्रिब्यूनल, अहमदनगर
लवाद प्राधिकरण : ३ रा मजला, वैकुंठभाई मेहता प्रशिक्षण सभागृह, नगर अर्बन को ऑप बँक लि, बॅक रोड, पानसरे गल्ली, अहमदनगर यांचे समोर हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, गैरहजर राहिल्यास आपणास काही सांगावयाचे नाही,असे समजुन लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम करणेत येईल, याची नोंद घ्यावी. आज रोजी आमचे सही शिक्यानिशी दिले असे.

शिक्का
श्री. प्रतीक पी. कोठारी
लवाद अधिकारी, अहमदनगर
ARL


# पथदिव्यांचा प्रकाश गायब; अंधारात हरवली देगलूरकरांची पहाट!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १ नोव्हेंबर-**

देगलूर शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते सरकार ढाबा या मार्गावरील दुभाजकावर बसविण्यात आलेले पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून अंधारातच आहेत. दररोज सकाळी नागरिक देगलूर महाविद्यालय व होट्टल रोडकडे व्यायामासाठी जात असतात मात्र त्यांची पहाट अंधारातच सुरुवात होते. यामुळे देगलूरकारांकडून नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



शहराला प्रकाशित करण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते सरकार ढाबा दरम्यान मुख्य रस्त्यावर तब्बल २२ पथदिवे उभे करण्यात आले आहेत. यापैकी दोन खांब जमीनदोस्त झाले तर बाकी विस पथदिवे बंद अवस्थेत आहेत. लाखो रुपये खर्च करून नागरिकांसाठी ही योजना आखण्यात आली परंतु योजनेतही अक्षरशः अंधारच दिसून येतो. नगरपरिषद देगलूरच्या प्रशासनाकडून यासंदर्भात मोठी गैरसोय होत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरुण तरुणींना धावताना दुखापत होऊ शकते. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी प्रश्नही उपस्थित होत आहे. या मार्गावर महाविद्यालयीन विद्यार्थी -विद्यार्थी, पोलिस व आर्मी भरती करणारे तरुण - तरुणी, विरंगुळ्यासाठी चालणारे जेष्ठ नागरिक, व्यायामासाठी येणारे देगलूरवासी मोबाईलचे टार्च चालू करुन मार्गक्रमण करीत आहेत. आतातरी प्रशासनाच्या डोक्यात कर्तव्य नावाच्या टार्चचा उजेड पडणार का?

या मार्गावर दिवे बंद असूनही कोणी चौकशी का करत नाही? महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? समाजाचा विकास करू इच्छिणाऱ्या लोकप्रतिनिधींना हा अंधार दिसत का नाही? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे या खांबावर राजकीय पुढाऱ्यांची बॅनरबाजी मात्र जोशात होत आहे. ते खांब नागरिकांना उजेड देण्यासाठी आहेत की राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनेरबाजीसाठी आहेत? हे आता नगरपरिषदेच्या प्रशासनाने घोषीत करावे, असा सवाल सुजाण नागरिकांकडून करण्यात येत आहे. आता पाहायचे इतकेच की, देगलूर नगरपरिषद अंधारावर प्रकाश टाकते का, की नागरिकांना आणखी काही दिवस टॉर्चच्या प्रकाशातच चालावे लागणार?